यूनिट 1

रविवार शाळा

# CBI

चिल्ड्रन्स् बायबल इन्व्हेस्टीगेशन मुलांचा



# शिक्षक

सर्व वयोगटासाठी

# सी बी आय: चिल्ड्रन्स् बायबल इन्व्हेस्टीगेशन मुलांचा पवित्र शास्त्र तपास

रविवार शाळा
यूनिट 1

# शिक्षक पुस्तीका

सर्व वयोगटासाठी (4-15वर्ष)
By Children Are Important

**“मुले महत्वपूर्ण आहेत” च्या संपूर्ण चमूचे आभार!**

Equip & Grow
Children are Important

Chief Editor: Kristina Krauss

Creative Team: Angie Kangas, Dwight Krauss, Flor Boldo, Jennifer Sánchez Nieto, Jon Kangas, Julio
Sánchez Nieto, Mike Kangas, Monserrat Duran Díaz, Rubén Darío, Suki Kangas, Verónica Toj, and Vickie Kangas.

Translation Team: Ali Atuha, Aline Xavier, Annupama Wankhede, Aroma Publications, Benjamin Gaxiola, Blessie Jetender, Blessy Jacob, Carla Mayumi, David Raju, Diana de León, Ephraim Njuguna Mirobi, Finny Jacob, Jacob Kuruvilla, Jetender Singh, Marcos Rocha, Mary Amelia Hernández, Mathew Das, Nassim Bougtaia, Paul Mwangi, Paul Septan, Rubina Rai, Sabrina Benny John, and SubtitleMe.

# सी बी आय मध्ये आपले स्वागत आहे........" चिल्ड्रन्स् बायबल इन्व्हेस्टीगेशन मुलांचा पवित्र शास्त्र तपास "!!!!

" चिल्ड्रन आर इम्पोर्टन्ट " मध्ये तुम्हाला रविवार शाळेचे, किंवा साप्ताहिक पवित्र शास्त्र प्रशिक्षणाचा आणखी एका वर्ष भराच्या वर्ग साहित्य देण्यास आम्हाला आनंद होत आहे, तुम्ही हे प्रशिक्षण तुमच्या मंडळीत, क्षेत्रात किंवा समाजात देऊ शकता. हया कार्यक्रमात तुमचे विद्यार्थी कल्पना करतील की ते विशेष एजन्ट किंवा तपासक आहेत आणि त्यांना दर आठवडी एक खटला सोडविण्यासाठी देण्यात आला आहे. जणू टी वी वरील सीबीआय चा कार्यक्रम. तुमचे विद्यार्थी हे पोलिस गुप्तहेर आणि विज्ञानाचे तंत्रज्ञ असतील जे प्रत्येक घटनेचा तपास करत असतांना फोटो काढतील. तुमच्या चर्चला विज्ञान प्रयोग शाळाच्या स्वरूपात तयार करण्यासासाठी, शिक्षकांना विज्ञान तंत्रज्ञासारखे व पोलिस गुप्तहेरासारखे तयार करण्यासाठी तुमच्या कल्पनाशक्तिचा उपयोग करा.

इतक्या वर्षापासून रविवार शाळा शिकवित असतांना मला असा अनुभव आला की, पाळकाचे मुलं किंवा नियमित रित्या मंडळीला जाणा-यांचे मुलं हे नेहमीच्या पवित्र शास्त्रातील गोष्टींशी परिचीत होवून जायचे. जर मी नोहाच्या तारवाची गोष्ट, किंवा योना व व्हेल मास्याची गोष्ट सांगायला सुरवात केली तर मुले कण्हत, कारण त्यांना गोष्टी आधीच माहीत असायच्या. मी वर्ग शिकवण्याची पद्ध्त बदलण्याचा प्रयत्न करीत असे, परंतू ती सारखीच होत असे, आणि माझे बरेचदा माझे विद्यार्थी कंटाळत असतं. ही समस्या लक्षात ठेवून "चिल्ड्रन आर इम्पोर्टन्ट" च्या कर्मचा-यांनी शिक्षकांसाठी ही नवीन कल्पना सूचविली, आपण विद्यार्थ्यांना गोष्ट सांगत नाही! त्याएवजी त्यांनी ती घटना किंवा तो खटला सोडविला पाहीजे आणि तुम्हाला ते दर आठवडी शिकणार असलेली गोष्ट सांगितली पाहीजे! हयाचाच अर्थ हा की हे अत्यंत महत्वाचे आहे की तुम्ही मुलांना शिक्षकाचे पुस्तक किंवा सूगाव्याचे उत्तर पाहू देऊ नये, जो पर्यंत ते गोष्ट ओळखत नाही. प्रत्येक आठवडी तुमच्याकडे त्यांना सांगण्यासाठी 5 सूगावे असतील जे त्यांना अंदाज लावण्यासाठी प्रोत्साहित करतील.जेव्हा मुले हया सूगाव्यांकडे पाहतील तेव्हा कोणत्याही गोष्टीची पुष्टी करू नका किंवा नाकारूही नका, जणे करून वर्गाच्या सुरवातीच्या काही मिनीटात सर्वांना सूगाव्याकडे पाहून पवित्र शास्त्रातील गोष्ट ओळखण्याचा आनंद प्राप्त होईल.

जेव्हा घटना उलगडते तेव्हा तुम्ही तुमच्या रविवार शाळेचे नेहमीचे भाग घ्यालः पवित्र शास्त्रतील गोष्ट, पाठांतर वचन, आणि जीवनासाठी लागूकरण. हया कार्यक्रमाला अधिक खोल करण्यासाठी आम्ही, आठवडा भरात मुलांना करण्यासाठी गृहपाठ दिला आहे. उदा. पहिल्या आठवडयात ते लहान असून सुध्दा देवासाठी महान गोष्टी करण्याबद्दल शिकतील. गृहपाठ म्हणून त्या आठवडयात ते घरी एखादे विशेष काम स्वीकारतील, जसे भांडे धूणे किंवा काही तरी जे घरी त्यांच्या कामाचा नेहमीचा भाग नाही आणि तसे करून ते पाहतील जे ते नेहमी करत नाही ते करीत असतांना देव त्यांना कसा आशिर्वाद देतो.

साधारण रविवार शाळेच्या भागांनंतर काही गंमतीचे कार्य आहे. दर आठवडी आम्ही खेळ, चर्चेसाठी प्रश्न, कोडे व रंग भरण्याची कृती असलेले विद्यार्थी पान, आणि विचीत्र शात्रज्ञ डॉ. लूकस सोबत विज्ञानाचे प्रयोगही देत आहोत. तुम्ही हे प्रयोग वर्गात प्रत्यक्ष करू शकता किंवा आम्ही तयार केलेले व्हीडीओ वापरू शकता.

आमच्या सेवेत नेहमी प्रमाणे, हया वर्षाचे सर्व साहित्य मोफत उपलब्ध आहे.जरी तुम्ही ग्रामीण भागात असला तरी तुम्ही इन्टरनेटच्या मदतीने हे साहित्य डाउनलोड करू शकता आणि विद्यार्थी पानांच्या प्रति काढायच्या की नाही हे ठरवू शकता. चिल्ड्रन बायबल इन्वेस्टीगेशन मध्ये भरपूर कृती आहेत जेणे करून त्या तुमच्या परिस्थितीसाठी उपयुक्त ठरतील जरी तुम्ही विद्यार्थी पुस्तक वापरण्याचा निर्णय घेतला नाही तरी. तुमच्या मंडळीत हा कार्यक्रम राबविण्यासाठी तुम्हाला इन्टरनेटची मात्र गरज पडेल! एक व्यक्ति वेळे आधी तयारी करून आवश्यक गोष्टी चर्च मध्ये आणेल, आणि तुमची सेवा वाढतांना तुम्ही पहाल!

चला एकत्र नविन रविवार शाळेच्या कार्यक्रमात झेप घेवू या!तुमचे विद्यार्थी अजूनही दाविद आणि गल्याथ, एस्तेर, उत्पत्ति, येशूचे पुनरूत्थान, शताधीपतीचा विश्वास आणि बरेच काही ते सीबीआयच्या 3 घटकातील 39 पाठातून शिकतील. तुमचा वर्ग मजेदार व आकर्षक करण्यासाठी मी तुम्हाला आव्हान करते! प्रयोग शाळेचा कोट, प्रत्यक्ष विज्ञान प्रयोग आणि "गुन्हा जागा" जीला आपण "पवित्र शास्त्राचे" दृष्य म्हणू हया बद्दल काल्पनिक व्हा. कदाचित तुम्हालाही तुमच्या विद्याथ्र्याप्रमाणे हया वर्षी खूप आनंद प्राप्त होईल!




नविन मजेदार प्रकारे मुलांची सेवा करत असतांना देव तुम्हाला भरपूर आशीर्वाद देवो.
ख्रिस्तात तुमची,

क्रिस्टीना क्रॉस

Equip & Grow
Children are Important

# कसे वापरावे

शिक्षकांनो, पवित्र शास्त्राच्या मजेदार तपासणी कार्यक्रमात आपले स्वागत आहे! आम्ही आशा ठेवतो की तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षित कराल व त्याच वेळेस एकत्रित मजाही कराल! हा कार्यक्रम रविवार शाळा, मुलांचे चर्च किंवा मुलांसाठी आठवडी क्लब सेवे मध्ये वापरता येईल. दृष्य साधनं आमच्या वेबसाईट वर पूरविण्यात आले आहेत जेणे करून तुम्ही प्रत्येक चित्र मोठे करून किंवा तुमच्या मोबाईल फोनवर मुलांना दाखवू शकता. आशा करतो की हया अभ्याक्रमाचे तीनही घटक तुम्हाला आवडतील, व तुम्हाला 9 महिन्याचे वर्ग साहित्य पूरविले जाईल. हया पहिल्या घटकात 13 पाठ आहे, इतर 2
घटकासह तुमच्याकडे एकूण 39 पाठ असतील.






## सुचविलेले वेळापत्रक

- ● परिचय आणि ५ सूगावे (५ - २०) मिनिटे
- ○ शीर्षक
- ○ नाटक/गोष्ट
- ○ वस्तु
- ○ पुरातत्व
- ○ बायबलमधील दृश्य
- ● मुख्य धड्याची वेळ (२०-२५ मिनिटे)
- ○ बायबल गोष्ट
- ○ लागुकरण
- ○ वचन पाठ करने Memory verse
- ○ देवाचा डीएनए
- ● गंमतीची वेळ  (१०- १५) मिनिटे
- ○ विद्यार्थ्यांची पुस्तके
- ○ चर्चा (मोठी मुले)
- ○ लुकास विज्ञान प्रयोग
- ○ खेळ

# सूगावे!



तुमच्या वर्गाची सुरवात तुमच्या तपासकांसाठी घटनेचा उलगडा करण्यासाठी सूगावे देवून करा. हया साठी 5 -15 मिनिट लागू शकतात, आणि मजा करणे हे तुमच्यावर अवलंबून राहील! प्रत्येक पाठासाठी 5 सूगावे आहेत. तुम्ही तुमच्या मोबाइल फोन वरील सूगाव्यांचा उपयोग करू शकता किंवा ते सूगावे मुलांना तपासण्यासाठी वर्गात तयार करू शकता.

## सुगावा #1 शीर्षक

पहिला सूगावा हा पाठाचे वास्तविक शिर्षक आहे. मुलांना शिर्षक वाचून दाखवा किंवा त्यांना पाहता येण्यासाठी ते छापून घ्या. उदा. दावीद आणि गल्याथाच्या पाठाला "बोथड शक्तिच्या भितीचा खटला" असे म्हटले आहे.बोथड शक्ति म्हणजे जेव्हा दावीदाने गल्याथाच्या डोक्यावर नदीतील दगडाने मारले त्याबद्दल आहे. कल्पना ही आहे की तपासक व संशोधक वापरतात तसे शब्द वापरून तुमच्या पवित्र शास्त्राच्या वर्गाला अधिक मजेशिर बनवावे. लक्षात ठेवा की तुम्ही तुमचे शिक्षकांचे पुस्तक विद्यार्थ्यांना दाखवू नये जेणे करून ते पवित्र शास्त्रातील गोष्ट पाहू शकणार नाही.

## सुगावा #2 नाटक

दर आठवड्याला दुसरा सूगावा म्हणजे एक छोटी "नाटक" गोष्ट - या गोष्टी बायबल गोष्टींना अधिक सूगावे देण्याचा एक मजेदार मार्ग आहेत. उदाहरणार्थ, धडा १ मध्ये लघुकथेत गोलियाथच्या नावाचा उल्लेख न करता एका फार मोठ्या सैनिकाबद्दल सांगितले आहे!
जर आपल्याकडे शिक्षकांची मोठी टीम असेल तर आपण सीबीआयः ड्रामा क्लूज पुस्तिकेतील नाटकाच्या स्क्रिप्टचा वापर करून हे नाटक सूगावे तयार करू शकता.





## सुगावा #3 वस्तू

प्रत्येक पाठात तुम्हाला वर्गात एक वस्तू आणायची आहे.ही भौतिक वस्तू राहील जिला तुमचे विद्यार्थी हात लावून अनुभवू शकतील, जेणे करून त्यांना पवित्र शास्त्रातील गोष्ट ओळखण्यासाठी मदत मिळेल.आपल्या उदाहरण पाठात तुम्हाला वर्गात 5 दगडं आणयचे आहेत जे दावीदाने नदीच्या पात्रातून उचलले, कोणत्याही गोष्टीची पुष्टी किंवा नकार न करण्याचा प्रयत्न करा.तुम्हाला तुमच्या विद्यार्थ्यांशी खोटे बोलायचे नाही, परंतू तुम्हाला मुलांनी गोष्टीबद्दल ज्यास्तीत ज्यास्त वेळ कूतुहल बाळगावे हा प्रत्यन करायचा आहे.


## सुगावा #4 पुराण वस्तू संशोधन

प्रत्येक पाठासाठी चौथा सूगावा पूराणवस्तू संशोधणातील वास्तविक जागा राहील. हया ठिकाणी चित्रात "गाथ" शहराचे वास्तविक अवशेष दाखविण्यात आले आहे.आज ती तेल झाफीट राष्ट्रीय उघानाच्या आत आहे. गूपितः गल्याथाचे पॅलेस्टाईन मधील निवासस्थान. तुम्ही त्यांना चित्र दाखवावे व हे सांगवे की हे पुरातन "गाथ" शहर आहे, परंतू गूपिताचा उल्गडा करू नये. अनेक लोकांना माहीती राहणार नाही की गाथ हे गल्याथाचे निवास स्थान असलेले शहर आहे, म्हणून तुमचा पाठ हा गूपित राहील!




## सुगावा #5 पवित्र शास्त्रातील दृष्य

प्रत्येक आठवडयाचा शेवटचा सूगावा हा पवित्र शास्त्रातील दृष्य राहील,असे जे तुम्ही तुमच्या तपासाकांना शोध लावण्यासाठी गुन्हा जागेसारखे तयार करू शकता.






उदा,
हन्न्या व सपीरा व त्यांची देवाबरोबर लबाडी हया पाठातील पवित्र शास्त्रातील दृष्य. तुम्ही पूरविलेल्या चित्राचा उपयोग करू शकता किंवा तुम्ही शरीराच्या आकृत्या काढून तुमच्या विद्यार्थ्यांना शोध लावण्यासाठी वास्तविक देखावा तयार करू शकता. जसे तुम्ही पाहू शकता, हया मंडळीतील लोकांनी पोलीसांचा पिवळा टेप सूगाव्यांच्या भोवती लावला व जमीनीवर शरीराच्या आकृती काढण्यासाठी ही टेप वापरला जेणे करून मुलांना तपास करण्यात अधिक आनंद प्राप्त होईल.

# घटना उलगडली!

तुमच्या विद्यार्थ्यांनी सर्व सूगाव्यांचा तपास लावल्यानंतर, त्यांना घटनेचा उलगडा करू दया किंवा त्या आठवडी तुम्ही पवित्र शास्त्रातील कोणती गोष्ट पाहणार ते सांगू दया. जर तुमच्याकडे असे विद्यार्थी आहेत जे बरेच वर्ष मंडळीत आले नाही तर त्यांना कठिण वाटेल व ते पवित्र शास्त्रातील गोष्ट ओळखू शकणार नाही. ही समस्या नाही पूढे जा व त्यांना पवित्र शास्त्रातील गोष्ट सांगा. जर ते बरोबर ओळखू शकले नाही तरी सूगाव्यामूळे प्रस्तावना मजेदार होईल व त्यामूळे तुमची रविवार शाळा निराळी असे दिसेल!



## बायबल गोष्ट

या आठवड्यात सर्व सूगावे पूर्ण केल्यानंतर आणि आपल्या विद्यार्थ्यांना बायबल गोष्ट काय आहे हे सांगितल्यानंतर, अता वेळ आहे सामान्य रविवारच्या शाळेच्या वर्गाप्रमाणे कथा सांगण्याची. दिलेल्या संदर्भातून तुम्ही बायबलची कथा पाहू शकता, किंवा शिक्षकांच्या पुस्तकाच्या साहाय्याने गोष्ट सांगा. जर तुम्ही गोष्ट सांगण्यासाठी आमच्या शिक्षकांच्या पुस्तकाचा वापर करणे निवडले, तर आपले बायबल देखील सोबती असणे चांगले राहिल, ती गोष्ट उघडे ठेवून. दर आठवड्याला एखाद्या व्यक्तीचे चित्र किंवा व्यंगचित्र असते कथा, कधी कथेचा नायक, तर कधी खलनायक. वरील धड्यात डेव्हिड आणि गोलियाथ, आपल्या विद्यार्थ्यांना दाखवण्यासाठी काढलेले चित्र गोलियाथचे आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला कार्ड देण्यासाठी देण्यात आलेल्या बायबल लोकांच्या कार्डचा वापर करा. हे हजेरी कार्ड म्हणून वापरले जाऊ शकतात किंवा त्यांचा वापर "अंदाज कोण" गेम खेळण्यासाठी देखील केला जाऊ शकतो. खेळाच्या सूचना या "कसे करावे" विभागाच्या शेवटी आहेत.

## पवित्र शास्त्रातील गोष्ट

सर्व सूगावे व त्या आठवडयाची पवित्र शास्त्राची गोष्ट सांगितल्या नंतर आता नेहमी प्रमाणे संन्डेस्कूल किंवा रविवार शाळा घेण्याची वेळ आहे.तुम्ही दिलेल्या संदर्भातून पवित्र शास्त्रातील गोष्ट पाहू शकता किंवा शिक्षक पुस्तकाच्या मदतीने गोष्ट सांगू शकता.जर तुम्ही आमच्या शिक्षक पुस्तकाची निवड गोष्ट सांगण्यासाठी केली तरी गोष्टीच्या त्या भागाकडे तुमचे पवित्र शास्त्र उघडून ठेवणे हे चांगले ठरेल. प्रत्येक आठवडी गोष्टितील व्यक्ति किंवा मुख्य पात्र हयाचे एक चित्र किंवा कार्टून राहील, आणि कधी कधी विलनचे सुध्दा. दावीद आणि गल्याथाच्या गोष्टी मध्ये तुमच्या विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी गल्याथाचे चित्र आहे.पवित्र शास्त्रातील लोकांचे चित्र कार्डांचा उपयोग मुलांना चित्र देण्यासाठी करा. हे हजेरी कार्ड म्हणून किंवा ओळखा पाहू हा खेळ खेळण्यासाठीही वापरता येतील. खेळासाठीचे निर्देश हया भागाच्या शेवटी दिलेले आहेत.

## लागुकरण

पाठ संपल्यानंतर जीवनासाठी लागूकरण सांगा. दावीद आणि गल्याथाच्या गोष्टीसाठी लागूकरण हे आहे की, “मी जरी लहान असलो तरी मी मोठया गोष्टी करू शकतो.” तुमच्या मुलांबरोबर हया संबंधी बोला की जरी तुम्ही लहान असले तरी देव त्याच्याही उपयोगा करून घेवू शकतो.

## गृहपाठ

दर आठवडी तुमच्या मुलांना आठवडाभर काही तरी करण्यासाठी गृहपाठ राहील. हा अभ्यासक्रमाचा सर्वात महत्वाचा भाग आहे! देवाची इच्छा आहे की आपण केवळ वचन ऐकणारे असू नये तर त्याप्रमाणे करणारे असावे! हे महत्वाचे आहे की विद्यार्थी मंडळीत जे शिकतात तसे त्यांनी आचरण करावे. केवळ सिध्दांत व पवित्र शास्त्रातील वचन पाठ करणारे व आठवडाभर त्या प्रमाणे न वागणारे विद्यार्थी बनवून आणखी शास्त्री व परूशी तयार करू नका. ढोंगी लोक तयार करण्याची चूक आपण करू इच्छित नाही! तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांना ढोंगी होण्यासाठी प्रोत्साहित करत नाही हे निश्चीत करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्यांना आठवडाभर पाठाप्रमाणे वागण्यासाठी सांगणे.



## देवाचा डीएनए

हा वर्गातील तो भाग आहे ज्यात आपण पवित्र शास्त्रातील धडयाच्या आधारे देव कोण आहे हयाबद्दल काही शिकू शकतो. उदा. दावीद आणि गल्याथाच्या पाठात आपण देवाबद्दल हे शिकतो की, “त्याच्या योजना पूर्ण करण्यासाठी देव लोकांचा उपयोग करून घेतो.”

# गंमतीची वेळ!

## खेळ

तुमच्या वर्गाचा खेळ महत्वाचा भाग आहे, कारण त्यामूळे तुमचे विद्यार्थी परत येत राहतील! मुलांना खेळ खेळायला आवडतात, आणि जर तुम्ही प्रत्येक वर्गात त्याचा समावेश केला तर तुम्ही दर आठवडी तुमचा वर्ग वाढतांना पाहाल. जितके ज्यास्त विद्यार्थी तुमच्या वर्गात असतील तितके ज्यास्त जीवनं तुम्ही बदलाल.

## चर्चा

दर आठवड्याला आम्ही आपल्याला मोठ्या मुलांसह वापरण्यासाठी तीन चर्चा प्रश्न दिले आहेत. हे उपयुक्त उत्तरांसह सीबीआय: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिकेत आढळू शकतात. आपल्या चर्चे चे नेतृत्व करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे आपल्या विद्यार्थ्यांना उत्तरे देऊ नका, परंतु त्यांना प्रत्येक प्रश्नाबद्दल खरोखर बोलू द्या. ते जितके जास्त वाद घालतील तेवढे तुम्ही चांगले करत आहात! म्हणून, एक चांगला युक्तिवाद करण्याचा प्रयत्न करा, आणि आपण खरोखर आपल्या विद्यार्थ्यांची खरी मते पाहू शकाल. एखाद्या प्रश्नावर चर्चा करताना तुम्ही त्या वेळी दिलेली उत्तरे वापरू शकता, तुमचे मत ही मांडू शकता.

## विद्यार्थी पानांसाठी उत्तरे

ह्या कार्यक्रमात असे पृष्ठ आहेत जे तुम्ही तुमच्या वर्गात कृती म्हणून वापरू शकता. मुलांना रंग भरायला व शब्दकोडे सोडवायला आवडते. अशा आहे कि तुम्ही तुमचा वर्ग मजेदार करण्यासाठी आमचे विद्यार्थी पुस्तक वापराल.ह्या भागात तुम्हाला विद्यार्थी पुस्तकाच्या 4 वयोगटाच्या कोडयांचे उत्तरे मिळतील.



## लूकसचा प्रयोग

आपल्या वर्गाचा शेवटचा उपक्रम म्हणजे वेड्या शास्त्रज्ञ डॉक्टर लूकस चा विज्ञान प्रयोग! दर आठवड्याला तो तुम्हाला विज्ञानाचा एक प्रयोग देतो जो तुम्ही वर्गात क्रियाकलाप म्हणून करू शकता. त्याचा व्हिडिओ तुम्ही एकत्र पाहू शकता किंवा तुम्ही स्वत: हा प्रयोग करू शकता.

## ओळखा पाहू कोण खेळ



तुमच्या वर्गाची शेवटची ऐच्छिक कृती ओळखा पाहू खेळ आहे जो तुम्ही पवित्र शास्त्रातील लोकांचे चित्र वापरून खेळू शकता. हा बैठा खेळ आहे जो दोन जोडीदारांमध्ये खेळला जातो जे एकमेकांविरूध्द खेळतात.

प्रत्येक विद्यार्थ्यासाठी 13 कार्ड छापा. शिक्षकांनाही पूर्ण कार्डची प्रत लागेल. तुमचे विद्यार्थी जसजसा हा खेळ खेळतील तसे ते पवित्र शास्त्रातील लोकांशी परिचित होतील. जाड कागद किंवा पुठ्ठा पंख्यासारखा दुमडा कार्ड ठेवण्यासाठी. खेळ असा आहे की तुमच्या शिक्षकाकडे किंवा प्रतिस्पर्धकाकडे कोणती व्यक्ति आहे ते ओळखणे. एका व्यक्तिच्या कार्डची निवड करून सुरवात करा व ते पुढच्या व्यक्तिकडून लपवून ठेवा.

पवित्र शास्त्रातील लोकांचे गुण पहा,त्यांच्या डोळयांचा रंग, त्यांच्या केसांचा रंग, किंवा त्यांना दाढी आहे का, त्याने टोपी घातली आहे का, त्याचे नाक व कानाचा आकार, ते पुरूष आहेत की स्त्री हे पहा. पहिला व्यक्ति प्रश्न विचारून सुरवात करतो व दुस-याने केवळ “हो” किंवा “नाही” असे उत्तर दयावे. दर डावाला केवळ एक प्रश्न विचारता येईल. जेव्हा तुम्हाला उत्तर मिळते तेव्हा ज्या कार्डवर किंवा चित्रावर ती गोष्ट नाही ते तुम्ही पलटावे. उदा. जर तुम्ही विचारता की ती स्त्री आहे का आणि तुमच्या जोडीदाराने नाही म्हटले तर तुम्ही सर्व स्त्रीयांचे चित्र पलटावे. मग ती पवित्र शास्त्रातील कोणती व्यक्ति आहे हे ओळखे पर्यंत प्रश्न विचारत राहवे!




ह्या कार्यक्रमात तीन घटक आहेत व 9 महिन्यांच्या वर्गाचे साहित्य आहे. वर्षाच्या शेवटी खेळण्यासाठी पवित्र शास्त्रातील लोकांचे तीन गट चित्र उपलब्ध राहतील म्हणजे एकूण 39 पवित्र शास्त्रातील लोक.

# घटना 1

## सुगावा #1 शीर्षक

बोथड शक्तिच्या भितीचा खटला

## सुगावा #3 वस्तू

वर्गात सूगावा म्हणून ही दृष्य वस्तू आणाः
5 दगडं.

## सुगावा #2 नाटक

एक सैनिक सैन्यापासून दूर राहून आपल्या बायकोकडे घरी येतो - त्या दिवशी घडलेला प्रकार तिला सांगायला तो इतका उत्सुक असतो की तो आपले कवच आणि तलवार सोबत घरी आणायला विसरतो! त्याने ते लष्कराच्या तंबूत सोडले!
तो तिला सांगतो की त्यांचा सर्वात मोठा सैनिक रोज कसा बाहेर पडून दुसऱ्या सैन्याला चिडवायचा! तो आणि त्याचे सैनिक साथीदार इतके निवांत होते की ते आपले कवच तंबूत सोडत असत, या सैन्यावर कोणी हल्ला करणार नव्हते!
पण आज काहीतरी बदललं आणि मोठा माणूस मारला गेला आणि सैनिक व त्याचं सैन्य घाबरून पळून गेलं!


## सुगावा #4 पुराण वस्तू संशोधन

गाथ शहराचे आधुनिक चित्र. आज हे तेल झाफीट राष्ट्रीय उघानाच्या आत आहे. (गूपितः पलिष्टी शहरातील गल्याथाचे घर)




## सुगावा #5 पवित्र शास्त्रातील दृष्य

गूपीतः गल्याथाच्या पायाचे मोठे ठसे, आणि सेनेच्या पायांचे लहान ठसे.



## धडा

**दावीद आणि गल्याथ पवित्र शास्त्रामधूनः 1 शमुवेल 17:53**



इस्त्राएल व पलिष्टयांच्या मध्ये युध्द भूमित उभा असतांना, दावीदाला माहीत होते की तो ही लढाई जिंकू शकतो. देव त्याच्या बाजूने असतांना तो हारू शकत नव्हता. परंतू त्याला 9 फूटाच्या विशाल माणसापूढे उभ्या असलेल्या शिपायांच्या मनातील भिती जाणवत होती. गल्याथ विशाल मोठा माणूस होता आणि इस्त्राएली लोकांना शिव्या शाप देत होती. कोणीही हया पलिष्टयाबरोबर लढण्यासाठी तयार नव्हते.

दावीद शिपाई होण्या एवढा मोठा नव्हता, तो लहानसा मेंढ़पाळ होता परंतू शूर होता. लहान वयात त्याने एका सिंहाला व एका अस्वलाला मारले होते केवळ त्याच्या हातातील काठीने. तरी दावीदाच्या बाजूने लढण्यासाठी देव होता. त्याला माहीत होते की देवाच्या नावाने आल्याने तो पराभूत होवू शकत नाही.
5 लहान दगडं उचलल्यानंतर, त्याने एक त्याच्या गोफणीत टाकला. गल्याथाचे शरीर जवळ जवळ येत होते, व त्याला माहीत होते की चांगल्या संधीची त्याने वाट पहावी त्याने त्याची गोफण फिरवायला सुरवात केली. ती गोल गोल होत गेली. आणि त्याने तो दगड तिच्या सोडला जेणे करून तो त्याच्या ध्येयर जाऊन पोहचेल. गल्याथाच्या डोळयांच्या मधली ती लहानशी जागा होती तिथे, आणि गल्याथ जमीनीवर कोसळला व मेला. पलीष्टीसेनेने जेव्हा त्यांचा शूर मेलेला पाहीला तेव्हा ती पळाली.

## लागूकरण

मी जरी लहान असलो तरी मोठया गोष्टी करू शकतो.

## गृहपाठ

हया आठवडी तुम्ही नेहमी करीत नाही अशी जवाबदारी स्वीकारा, क़िवा तुमच्या आईवडीलांसाठी असे काम करा जी तुमची नेहमीची जवाबदारी नाही. देवाला मोठया गोष्टी करतांना पहा.

## पाठांतर वचन

" परमेश्वर म्हणता, तुम्हांविषयी माझ्या मनांत जे संकल्प आहेत ते मी जाणता, ते संकल्प हिताचे आहेत अनिष्टाचे नाहीत, ते तुम्हांस तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत. "
(यिर्मया 29:11)



## देवाचा डीएनए

हया पाठातून आपण देवाबद्दल काय शिकतो? देव त्याच्या योजना पूर्ण करण्यासाठी लोकांचा उपयोग करता.



## खेळ

सावलीचा खेळ
हा खेळ इतर खेळांसारखाच आहे जिथे शिक्षक काही मुलांना डाव देण्यासाठी निवडतात आणि ते इतरांच्या मागे जाऊन त्यांना पकडतात.हया खेळात डाव देणारा इतरांना स्पर्श करण्याएवजी त्यांच्या सावलीवर पाय देऊन त्यांना बाद करतो.




## लूकसचा प्रयोग


एका भांडयात एकचतुथांश कप विनीगर एकचतुथांश कप पाणी एकत्र करा आणि त्यात एकचतुथांश कप बेकिंग सोडा टाका. मिश्रणला फेस येईल आणि भांडे कार्बन डायऑक्साईन ने भरून जाईल जे पाण्यापेक्षा हलके असते. वरचा वायू जळणा-या मेणबत्तीवर टाका आणि ती मेणबत्ती विझून जाईल.
(व्हिडिओ पाहण्यासाठी किंवा सीबीआयकडे जाण्यासाठी या क्यूआर कोडचा वापर करा: लुकसचे यूट्यूबवरील प्रयोग)


## चर्चेसाठी प्रश्न :

आजच्या धड्याविषयी चर्चेत मोठ्या विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी सीबीआयच्या प्रश्नांचा वापर करा: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिका. त्याची उत्तरेही पुस्तिकेत देण्यात आली आहेत.

## विद्यार्थी पानांसाठी उत्तरे





| | |
|---|---|
| दावीद | लढाई |
| सव | शिपाई |
| पाच | विश्वास |
| मोल | तरूण |
| भिती | लढाई |
| गल्याथ | मुलगा |
| दगड | देव |
| पॅलेस्टाइन | |

# घटना 2

## सुगावा #1 शीर्षक

हरवलेल्या मृतदेहाचे प्रकरण

## सुगावा #2 नाटक

हरवलेल्या मृतदेहाचा पोलीस तपास करत आहेत! त्यांना धुळीत पाऊलखुणांचे अनेक संच सापडतात: बूट छापचे २ संच २ पुरुष पहारा देत उभे आहेत असे दिसते, लहान पाऊलखुणांचे २ संच त्या भागात २ स्त्रिया आल्यासारखे दिसतात, पुरुषांच्या पावलांचे २ संच जणू ते धावत आहेत आणि शेवटी एक पावलांचे ठसे जे गुहेतून बाहेर पडतात परंतु गुहेत जात नाहीत. याचा अर्थ काय असू शकतो?

## सुगावा #3 वस्तू

वर्गात दिसणारी वस्तू घेवून याः गजराची घडयाळ.


## सुगावा #4 पुराण वस्तू संशोधन

ची रो रिथसह हे कॅटाकोम्ब मध्ये सापडले जीथे बरेच गुप्त चिन्ह होते (सीरका 350) (गुपीत: ते पुनरूथ्थानाच्या विजयाचे प्रतीक आहेत आणि रोमी शिपायाच्या वर दाखविण्यात आले आहेत.)





## सुगावा #5 पवित्र शास्त्रातील दृष्य

गुपितः मरीया मग्दालीयाने ओतलेले द्रव्य, शिपायांच्या जवळचे पैसे, बाग आणि माळयाची टोपी कारण मरियेला वाटले की तो माळी आहे.



## धडा

**ख्रिस्ताचे पुनरूत्थ्थान पवित्र शास्त्रातूनः मत्तय 28; योहान 20:6-8**



शिष्यांना आश्चर्य वाटावे म्हणून येशूने त्यांना ज्या सर्व गोष्टीची ताकीद दिली होती त्या सर्व घडल्या. येशूला फसविण्यात आले, त्याचा छळ झाला आणि त्याला वधस्तंभावर खिळण्यात आले. तिन दिवसानंतर, भल्या पहाटेस मुख्य याजकांनी शिपायांबरोबर गुप्त सभा घेतली.शिपायांनी सांगितले की कसा मोठा भूमीकंप झाला. प्रभूचा दूत खाली आला त्याने कबरेवरची धोंड बाजूला केली आणि आता त्याच्यावर बसलेला आहे.तो त्याच्या बर्फासारख्या पांढ-या कपडयात विजे सारखा दिसत होता. त्यांनी हे सुध्दा सांगितले की ते कसे घाबरले, थर थर कापले आणि बेशुध्द होवून पडले. मुख्य याजकांनी एक योजना आखली आणी त्यांनी शिपायांना पुष्कळ पैसे दिले व त्यांना खोटे बोलायला लावले की ...
आम्ही झोपलो असतांना त्याचे शिष्य आले व त्यांनी त्याला चोरून नेले... आणखी जर राज्यापालाला हे कळले व त्यांच्यावर आफात आली तर ते त्यांना सांभाळतील असेही त्यांनी शिपायांना सांगितले. जेव्हा मरीया व दूसरी मरीया कबरे कडे गेल्या तेव्हा देवदूत त्या स्त्रीयांना म्हणाला, "घाबरू नका कारण मला माहीत आहे की तुम्ही वधस्तंभावर खिळलेल्या येशूचा शोध करता. तो इथे नाही, त्याने सांगितल्या प्रमाणे तो उठला आहे. या तो निजला होता ती जागा पहा."मग पटकण जा आणि त्याच्या शिष्यास सांगाः तो मरणातून उठला आहे व तुमच्या पूढे गालीलात जात आहे. तीथे तुम्ही त्याला पहाल. स्त्रीया कबरेकडून घाईने इतरांना सांगायला गेल्या. मग येशूने त्यांना दर्शन दिले व म्हटले, "अभिवादन, घाबरू नका. जा माझ्या बंधूंना सांगा की गालीलात जा तिथे ते मला पाहतील."
पेत्र व योहानाला स्वतः पाहायचे होते. ते कबरेकडे धावत गेले. आत पाहील्यावर त्यांना डोक्याचा रूमाल व अंग वस्त्र नीट गुंडाळलेले आढळले. जेव्हा त्यांनी पूरावा पाहीला तेव्हा त्यांनी विश्वास ठेवला आणि त्यांना कळले की येशू खरंच मरणातून जीवंत झाला आहे!

## लागूकरण

जेव्हा मला असे वाटते की सर्व काही वाईट झाले तेव्हा देव विश्वासू आहे.

## गृहपाठ

कोणाला तरी अशा वेळे बद्दल सांगा की जेव्हा तुमच्यासाठी सर्व काही वाईट होत होते परंतू ते सर्व नंतर चांगले झाले.देवाने त्यामूळे तुम्हाला महत्वाच्या गोष्टी शिकविल्या.

## पाठांतर वचन

ज्याने स्वपुत्र येशू ख्रिस्त आपला प्रभु हयाच्या सहभागीपणांत तुम्हांला बोलाविले तो देव विश्वसनीय आहे.

1 करिंथ 1:9



## देवाचा डीएनए

हया पाठातून तुम्ही देवाबद्दल काय शिकता? देवाची इच्छा आहे की लोकांनी येशूला आणि तो पृथ्वीवर कशाला आला हे ओळखावे.



## खेळ

एका वर्गात फुगा फुटबॉल

गटाची दोन संघ विभागणी करा, खुर्च्यांच्या दोन रांगेत किंवा जमिनीवर बसून, सुमारे एक मीटर अंतरावर, प्रत्येक संघातील पर्यायी खेळाडू. दोन्ही टोकांवर संघांसाठी गोल पोस्ट चिन्हांकित करा. लीडर फुगा मध्यभागी फेकून खेळात ठेवतो. खेळाडूंनी कायम बसून राहिले पाहिजे. मैदानावर फुगा बॅटिंग करून गोल करणे हा खेळाचा उद्देश असतो. फुटबॉलप्रमाणे, जेव्हा फुग्याला मर्यादेबाहेर मारले जाते, तेव्हा लीडर दुसर्या संघाला खेळण्यासाठी फुगा देतो.




## लूकसचा प्रयोग

मुलांना तीन लपलेल्या गोष्टींचा विचार करू दयाः एक गोष्ट जी लपलेली आहे व शोधता येते; एक गोष्ट जी लपलेली आहे व शोधता येत नाही; एक गोष्ट जी लपवलेली आहे व स्वतःच गायाब होते. गंमतीचे कार्य म्हणून, त्यांना शोधण्यासाठी वर्गात काही गोष्टी लपवून ठेवा.
(व्हिडिओ पाहण्यासाठी किंवा सीबीआयकडे जाण्यासाठी या क्यूआर कोडचा वापर करा: लुकसचे यूट्यूबवरील प्रयोग)


### चर्चेसाठी प्रश्न :

आजच्या धड्याविषयी चर्चेत मोठ्या विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी सीबीआयच्या प्रश्नांचा वापर करा: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिका. त्याची उत्तरेही पुस्तिकेत देण्यात आली आहेत.

## विद्यार्थी पानांसाठी उत्तरे



पांढ-या चैकणावर सुरवात करा आणि मग काळया चैकणाला स्पर्श करत जा. मग पांढ-या, काळया, पांढ-यावर असे करत पुढे जा. एका कोप-यातून दुस-या कोप-याकडे जावू नका.



| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | ब | र | आ | रि | च | म | श | स |
| ठे | श | आ | ना | का | ता | र | णा | रा |
| शि | पा | ई | स | मी | ठे | ण | आ | ई |
| मी | ळ | व | ध | स्तं | भ | भि | ळ | वा |
| आ | श्च | र्य | ण | य | आ | ती | आ | ई |
| स | जी | पु | न | रू | त्थी | त | शि | या |
| र | व | वि | श्वा | स | ठे | व | णे | र |
| आ | न | णा | रा | का | ख् | श | ई | य |
| वा | शि | ष्य | च | ळ | ता | र | णा | रा |
| पु | म | ब | ख्रि | म | ता | ई | क् | ष |
| श | रि | ख् | स्त | ई | त | च | आ | स |
| प | या | ळ | स | ठे | ब | ठे | व | णे |

ख्रिस्त
वधस्तंभ
मरण
जीवन
तारणारा
पुनरूत्थीत
शिष्य
विश्वास ठेवणे
आश्चर्य
शिपाई

सकाळ
मरिया
भिती
कबर
रिकामी

# घटना 3

## सुगावा #1 शीर्षक

बोटीतून फेकलेल्या माणसाचा खाटला.

## सुगावा #2 नाटक

एका बोटीच्या कॅप्टनने समुद्रात पडलेल्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी तटरक्षक दलाला बोलाविले आहे. अचानक आणि भयानक वादळ आले होते आणि तो माणूस "बोटीतून खाली पडला होता". बोटीच्या कर्मचाऱ्यांनी त्याचा शोध घेतला होता पण तो समुद्रात दिसला नाही, तो नुकताच गायब झाला होता. पूर्णपणे गायब झाला !

## सुगावा #3 वस्तू

या भौतिक वस्तूला सुगावा म्हणून वर्गात आणा: मासेमारी जाळी / बोटीचे चित्र

## सुगावा #5 पवित्र शास्त्रातील दृष्य

गुपितः बोटीवर प्रवासी चिठ्ठ्या टाकतात, वादळाचे ढग दूर होतात कारण वादळ शांत होते.

## सुगावा #4 पुराण वस्तू संशोधन

निनवे हे 150,000 लोकसंख्या असलेले, मोठे राजवाडे, मंदीर व मोठ्या भिंती व मिनार असलेले भव्य शहर होते. हे आधुनिक चित्र जुन्या निनवेच्या भिंती दाखविते, त्यातील काही भागांची पुन्हा बांधणी करण्यात आली आहे. (गुपितः निनवे ते शहर आहे जिथे देवाने योनाला पाठविले होते.)






## धडा योना पवित्र शास्त्रा मधूनः योना 1



निनवे शहर देवाच्या दृष्टीने वाईट गोष्टी करत होते व देवाने योनाला सांगितले की त्यांना ताकीद देण्यासाठी जा. देवाची इच्छा होती की पाप थांबावे. आज्ञा पाळण्याएवजी योनाने पळून जाण्याचा निर्णय घेतला व त्याने एक जहाज शोधले जे त्याला दूर पळून जाण्यासाठी मदत करेल. योना रात्री झोपायला गेला असतांना बोटीवरील कर्मचा-यांना येणारे वादळ दिसत होते. काही तासांनी जहाजाच्या मुख्य अधिका-याने योनाला शोधले व त्याच्या कडून हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला की तो इतक्या भयंकर वादळात झोपू कसा शकतो. कर्मचा-यांना माहीत होते की जहाज बुडणार आहे आणि त्यांना माहीत करून घ्यायचे होते की देवाने इतके भयंकर वादळ का पाठविले. चूक कोणाची आहे हे माहीत करून घेण्यासाठी चिठ्ठया टाकणे हा सर्वात चांगला उपाय होता व योनाच्या नावाची चिठ्ठी निघाली. त्यांना माहीती हवी होती की काय घडत आहे, म्हणून योनाने त्याचे पाप कबूल केले व त्यांना म्हटले की मला जहाजातून बाहेर फेकून दया. कर्मचा-यांना इतकी मोठी गोष्ट करायची नव्हती म्हणून त्यांनी जहाज किना-या कडे नेण्याचा प्रयत्न केला. परंतू वादळ अधिक वाढले आणि त्यांनी योनाला जहाजातून बाहेर फेकण्याचा निर्णय घेतला. योना पाण्यात पडल्याबरोबर वादळ शांत झाले आणि जहाज वाचले!परंतू योना जसा पोहू लागला एक मोठा मासा आला व त्याने योनाला गिळले. तीन दिवस व तीन रात्र योना माश्याच्या पोटात होता व करता येण्यासारखी एकमेव गोष्ट करत होता: प्रार्थना करणे. देवाने त्याला क्षमा करावी अशी त्याने प्रार्थना केली, त्याने त्याच्या पापांसाठी पश्चाताप केला व देवाला सांगितले की जे काही तो त्याला करायला लावेल ते तो करील. देवाने योनाच्या प्रार्थनेचे उत्तर दिले व मोठ्या माश्याने त्याला कोरडया भूमिवर ओकले.

## लागूकरण

जेव्हा मला माझे पाप दिसते तेव्हा मी पश्चाताप करून ते करणे थांबविले पाहिजे.

## गृहपाठ

हया आठवडी जी चूकीची गोष्ट तुम्ही करता व ज्याची तुम्हाला लाज वाटते व जीचे चित्र तुम्ही सार्वजनिक रित्या दाखवू इच्छिणार नाही त्यासंबंधी संवेदनशील किंवा जागरूक असा. पश्चाताप करा. देवाला तुम्हाला प्रथम विचार करण्यासाठी व ती गोष्ट पुन्हा करणे थांबविण्यासाठी मदत मागा.

## पाठांतर वचन

" तुमचे पापे पुसून टाकली जावी म्हणून पश्चाताप करा व वळा; अशासाठी की, विश्रांतीचे समय प्रभूजवळ यावे. "
प्रेषित 3:19



## देवाचा डीएनए

हया पाठातून आपण देवाबद्दल काय शिकतो? देव त्याच्या लोकांकडुन सोप्या जीवनापेक्षा आज्ञापालन प्राप्त करणे पसंत करतो.



## खेळ

### माशांच्या शेपटी

प्रत्येक मुलाला त्याच्या मागच्या खिशात किंवा कंबरपट्टीत ठेवण्यासाठी एक जुना मोजा (लोकर, दोरी, कागद किंवा कापडाचा तुकडा देखील कार्य करेल) द्या. स्वत:चा न गमावता इतर खेळाडूंची "शेपटी" पकडणे हा या खेळाचा उद्देश असतो. शेपटी गमावलेल्या कोणत्याही खेळाडूला खाली बसावे लागते, परंतु जर दुसरा खेळाडू पुरेसा जवळून गेला तर शेपटी नसलेला खेळाडू स्वत: ला नवीन शेपटी पकडून खेळात पुन्हा प्रवेश करू शकतो.




## लूकसचा प्रयोग


विद्यार्थ्यांना मार्शमेलो कापून व अडकवण्याचे झाड दात कोरनी वापरून, पाण्याच्या भांडयात मार्शमेलोचे बेट तयार करू दया पाण्याचे भांडे समुद्रचे प्रतिक असेल. पारदर्शक काच ठेवून बेटाला पाण्यात बुडवा. गंमतीसाठी बेटावर एखादी व्यक्ति पाहू शकेल त्या वस्तूंचे चित्र काढा.
(व्हिडिओ पाहण्यासाठी किंवा सीबीआयकडे जाण्यासाठी या क्यूआर कोडचा वापर करा: लुकसचे यूट्यूबवरील प्रयोग)

## चर्चेसाठी प्रश्न :

आजच्या धड्याविषयी चर्चेत मोठ्या विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी सीबीआयच्या प्रश्नांचा वापर करा: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिका. त्याची उत्तरेही पुस्तिकेत देण्यात आली आहेत.

## विद्यार्थी पानांसाठी उत्तरे





| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पॅ | ले | स | टा | इ | धै | र् | य | वा | न | ज |
| स | धै | स | पो | मा | क | यो | ज | हा | ज | आ |
| ल | वा | ई | ट | सु | रा | ना | वी | पो | श्चा | ज्ञा |
| नि | न | वे | ज | र | त्र | स | न | वा | रा | पा |
| ज | पा | ल | ल | ता | र | स | स | द | र | ल |
| सु | वा | र्ति | क | क | क | ब | र | ळ | न | न |
| प | श्चा | ता | प | आ | ज | क् | क्ष | मा | न | र्ति |
| मा | धै | स | स | ट | सु | ष | क | सा | ल | क |

योना
मासा
तारसस
निनवे
वाईट
पोट
नावी
जहाज
वारा

वादळ
रात्र
पश्चाताप
सुवार्तिक
आज्ञापालन
क्षमा

# घटना ४

## सुगावा #1 शीर्षक

निनावी मदतनीसाचा खटला

## सुगावा #2 नाटक

पोलीस एका व्यक्तीची मुलाखत घेत आहेत - तो नुकताच हायवेवरून प्रवास करून आला आहे. हा महामार्ग प्रवाशांसाठी धोकादायक ठिकाण म्हणून ओळखला जात असून अनेक चोरट्यांनी त्यांच्यावर हल्ला करून त्यांचा माल चोरून नेला आहे. या व्यक्तीने आज प्रवास करताना काही संशयास्पद पाहिले होते का, हे पोलिसांना जाणून घ्यायचे आहे. तो माणूस म्हणतो की त्याला रस्त्याच्या कडेला काहीतरी पाहिल्याचे आठवते परंतु ते काय आहे हे पाहण्यासाठी तो थांबला नाही.


## सुगावा #3 वस्तू

वर्गात सुगावा म्हणून ही वस्तू आणाः बॅन्ड ऐडची चकट पट्टी.

## सुगावा #4 पुराण वस्तू संशोधन

आज एका दवाखान्याच्या आकस्मीत विभागाच्या प्रवेशाकडे मी आलो. (गुपितः जिथे चांगल्या शमरोन्याने हल्ला झालेल्या माणसाला मदतीसाठी पाठविले असेल.)



## सुगावा #5 पवित्र शास्त्रातील दृष्य

गुपितः रिकामी पिश्वी व शिक्के हालवणे कारण त्याला लूटण्यात आले होते, रस्त्याच्या दुस-या बाजूला पावलांचे दोन ठसे याजक व परूश्यासाठी, मारलेल्या माणसाच्या शरीराचा ठसा कारण तो आता तिथे नव्हता.

## धडा चांगला शमरोनी पवित्र शास्त्रा मधूनः लूक 10: 25-37



एका नियमशास्त्राच्या पंडीताने येशूला कोडे विचारून त्याची परिक्षा केली. सार्वकालिक जीवन प्राप्त करण्यासाठी मी काय करावे? येशूने त्याला महान आज्ञा सांगून उत्तर दिलेः ”आपला देव परमेश्वर याजवर पूर्ण मनाने, पूर्ण जीवाने व पूर्ण शक्तिने प्रिती कर“ आणि ”जशी आपणावर तशी आपल्या शेजा-यावर प्रिती कर“ विद्वानाने स्वतःचा बचाव करण्यासाठी त्याला विचारले, ”माझा शेजारी कोण?“ त्याला लोकांची यादी देवून त्यांच्याशी चांगले वागायला लावण्याऐवजी येशूने त्याला खालिल गोष्ट सांगून शेजारी कसे बनावे हे सांगितले.

यरूशलेम कडून यरिहोच्या मातीच्या रस्त्यावर जात असतांना काही लुटारूंनी एका माणसाला अर्ध मेले होई पर्यंत मारले व त्याचे कपडेही घेऊन घेतले. विना कपडयांचा, रक्तबंबाळ, चालता येत नसलेला मातीत पडलेल्या हया माणसाने एका याजकाला येतांना पाहिले. मदत करण्यासाठी थांबण्याएवजी याजक रस्त्याच्या दुस-या बाजूने चालत पूढे निघून गेला. त्यानंतर लवकरच एक देवाचे भय धरणा-या कुटुंबातील लेवी मनुष्य आला.परंतु जेव्हा त्याची नजर हया मनुष्यावर पडली तेव्हा त्यांने रस्ता ओलांडला जेणे करून त्याला हया जखमी मुनष्याजवळून जावे लागणार नाही. मग एक घाणेरडा विदेशी आला ज्याचे मंडळीत स्वागत नव्हते व तो देवाची चूकीची भक्ति करित असे शमरोनी, त्याने हया माणसाला पाहिले व त्याच्यावर त्याने दया केली. हा विदेशी थांबला, त्याने त्याला मलमपट्टी केली आणि त्याला उतारशाळेपर्यंत नेले व सर्व गोष्टींचे पैसे भरलेः राहण्याची जागा, खर्च आणि त्याची काळजी घेण्यासाठी कोणीतरी. हया तीघांपैकी कोण लूटारूंच्या हाती सापडलेल्या हया माणसाचा शेजारी झाला? नियमशास्त्राच्या विद्वानाने उत्तर दिले, ज्याने त्याच्यावर दया केली तो. येशूने त्याला उत्तर दिले, तु ही जाऊन तसेच कर.“

## लागूकरण

चांगल्या शमरोन्या प्रमाणे मी सुध्दा सर्वांसोबत दयाळूपणे वागलो पाहीजे.

## देवाचा डीएनए

हया पाठाद्वारे आपण देवासंबंधाने काय शिकतो? देवाची इच्छा आहे की आपण इतरांना मदत करावी.

## पाठांतर वचन

" कारण जे तुमच्यावर प्रिती करतात त्यांच्यावर तुम्ही प्रिती केली तर तुमचे प्रतिफळ काय? जकातदारही तसेच करितात ना?" मत्तय 5:46

## गृहपाठ

मित्र नसलेला कोणीतरी शोधा व मैत्रीपूर्ण रित्या त्याच्या पर्यंत पोहचा. तुम्ही त्याला शाळेनंतर खेळण्यासाठी आमंत्रित करू शकता किंवा दुपारच्या जेवणाच्या वेळेस तुमच्यासोबत बसायला बोलावू शकता.




## खेळ मित्राची चिठ्ठी

हा बाहेर खेळण्याचा पार्टीचा खेळ आहे ज्यात कमीत कमी 6 खेळाडू असावे (अधिक असल्यास अधिक चांगले). सुरवात करण्यासाठी एक व्यक्ति जो डाव देणारा आहे आणि एक धावणारा आहे. दुसरे प्रत्येक जण एक मित्र शोधतात व हातात हात घालून मग मैदानावर पसरतात. तो धावणा-याला चिठ्ठी लावण्याचा प्रयत्न करतो. धावणा-याने त्याला कागद लागण्याआधी मित्रांच्या जोडीबरोबर हातात हातमैत्रीचे जाळे तयार झाले आहे. घालायचा आहे. जेव्हा धावणा-याला जोडीदार मिळतो, तेव्हा मित्रांच्या किंवा जोडीदाराच्या दुस-या बाजूची व्यक्ति ही धावणारी होते. जर धावणारी व्यक्ति त्याला कागदाची चिठ्ठी लावण्याआधी जोडीदार मिळवू शकत नाही तर मग तो डाव देणारा होतो व डाव देणारा धावणारा होतो.

लहान मुलांसाठी पर्यायः मित्राचे जाळे

मुलांना घट्ट अशा गोलात जमीनीवर बसवा. धाग्याचा गोळा वापरून एखादया मुलांकडे निर्देश करून विचारा? मी सर्वात आनंदी असतो जेव्हा.....? जसे मुल उत्तर देते त्याला तो गोळा दया, त्यांनी त्या दो-याच्या शेवटचे टोक सांभाळावे किंवा घट्ट पकडून ठेवावे हयाकडे लक्ष दया आणि मग ते गोलातल्या दुस-या बाजूच्या मित्राला तो प्रश्न विचारतील, मी सर्वात आनंदी असतो जेव्हा....? आणि दोरीचा गोळा त्या मुलाकडे देतील. सर्वांनी उत्तर देऊन होई पर्यंत असे करत राहा. जर मुलांना हा खेळ आवडला तर प्रश्न बदलून हा खेळ सुरू ठेवा जसे मी खूप दुखी होतो जेव्हा....? आणि गोळा एकमेकांकडे देत राहा. जेव्हा खेळ पूर्ण होईल तेव्हा सर्व मुलांना त्यांच्या दो-याचा भाग घट्ट धरून उभे करा. आता तुमच्याकडे




## लूकसचा प्रयोग


हा प्रयोग दृष्टीकोन पाहण्यात मदत करतो आणि हे दाखवून देतो की आपण गोष्टी पाहतो त्याने दृष्टीकोन कसा बदलतो. हया दोन रेषा पहा, आणि त्यातील एक कशी मोठी दिसते ते पहा. दुसरी कल्पना आहे की कशा दोन आडव्या रेषा एकमेकाना समांतर आहेत, परंतू त्या तशा दिसत नाहीत. तिसरे उदाहरण हे मुल व उंदीर आणि त्यांच्याच्या मधील बिंदूचे आहे. जसे तुम्ही त्या बिंदू कडे नाक नेता तसे तुम्हाला वाटते की उंदीर मुलाच्या जवळ येत आहे. व्हीडिओ मध्ये दाखविल्याप्रमाणे हे तिन्ही उदाहरण तुमच्या मुलांना पाहू दया. (व्हिडिओ पाहण्यासाठी किंवा सीबीआयकडे जाण्यासाठी या क्यूआर कोडचा वापर करा: लुकसचे यूट्यूबवरील प्रयोग)

## चर्चेसाठी प्रश्न :

आजच्या धड्याविषयी चर्चेत मोठ्या विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी सीबीआयच्या प्रश्नांचा वापर करा: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिका. त्याची उत्तरेही पुस्तिकेत देण्यात आली आहेत.

## विद्यार्थी पानांसाठी उत्तरे





| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क | प | डे | शी | नि | पू | ण | य |
| ले | स | श | ले | य | शे | जा | री |
| वी | का | भ | र | म | vडे | श | हो |
| र् | कृ | पा | ळू | प | णा | म | ळू |
| प् | मा | जा | ना | णे | क | रो | प |
| चो | र | जा | म | द | त | नी | स |
| डे | भ | ती | क | आ | ज्ञा | प्रि | णा |
| वि | दे | शी | ख | र | स् | कृ | ती |

निपूण
नियम
शमरोनी
कृपाळूपणा
मदतनीस
शेजारी
चोर
नाणे
प्रिती
कपडे

लेवी
मार
आज्ञा
यरीहो
विदेशी

# घटना 5

## सुगावा #1 शीर्षक

जल्लादाच्या फासाचे प्रकरण

## सुगावा #2 नाटक

रात्री मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या शेजाऱ्याला भेटण्यासाठी पोलिस आले आहेत. शेजाऱ्याने पोलिसांना सांगितले की, दुसऱ्या घोषणेपूर्वी त्यांनी आपल्या घरासमोर इमारतीचे काम सुरू असल्याचे पाहिले होते. ते म्हणाले की हे सर्व किती विचित्र आहे - मागच्या च आठवड्यात तो माणूस शहरभर फिरत होता आणि सर्वांना सांगत होता की तो किती महान माणूस आहे, आणि लोकांना आश्चर्य वाटले होते की तो एखाद्याच्या मृत्यूची योजना आखत होता का! आणि आता तो मेला आहे!

## सुगावा #3 वस्तू

वर्गात ही दृष्य वस्तू आणाः रंगीत कागदाचे तुकडे


## सुगावा #4 पुराण वस्तू संशोधन

अहश्वेरोश राजाच्या कबरेचे चित्र (ख्रिस्त पूर्व 486-465). त्याची कबर इराण मध्ये आहे आणि हे ऐतिहासिक ठिकाण इतर प्रसिध्द परशीयाच्या राजांच्या कबरेसह नाक-ए-रूस्तम असे संबोधल्या जाते. (छायचित्र अमीर हूसेन झोल्फागरे) (गूपितः झेरेक्सीस हा एस्तेरच्या पुस्तकातील राजा आहे.)




## सुगावा #5 पवित्र शास्त्रातील दृष्य

गूपितः राजाचाच्या मुद्रेचा आदेश व बाजूला त्याच्या अंगठीचा ठसा. एस्तेर 3:12 व 8:8.



## धडा

**एस्तेर पवित्र शास्त्रामधूनः एस्तेर 2-7**



एस्तेर मर्दखयाची भाची होती जो अहश्वरोश राजाचा विश्वासू सेवक होता. अहश्वरोश राजा सुंदर नवीन पत्नी शोधत होता.मर्दखयाने एस्तेरला राजाला भेटण्याआधी 12 महिन्यांच्या सौदर्य प्रक्रियेतून जायला लावले. ती इतकी सुंदर होती की तिला पाहील्याबरोबर राजाचे तिच्यावर प्रेम बसले व त्याने तिच्याबरोबर विवाह केला. हामान राजाचा मोठा अधिकारी होता, तो यहूदी लोकांचा द्वेष करित अस आणि त्याला दरबाराच्या दारांमधून चालणे आवडत असे जेणे करून लोक त्याला नमन करतील. मर्दखयाला सोडून बाकी सर्व लोक त्याला नमन करित असत, मर्दखय केवळ एकमेव ख-या देवापूढे नमन करित असे. हामानाच्या मनात मर्दखयासाठी जो राग होता त्याच्या मूळे त्याने सर्व यहूदी लोकांना मारण्याची योजना केली. त्याने राजाला सांगितले की काही लोक त्याचे नियम पाळत नाहीत. अहश्वरोश राजाने म्हटले की हामानाला जे पाहीजे ते तो करू शकतो. म्हणून हामानाने फर्मान काढले की सर्व यहूदी लोकांना मारण्यात यावे. मग त्याने त्याच्या घरी मोठा खांब उभा केला ज्यावर तो मर्दखयाला फाशी देऊ शकेल. एस्तेरला हामानाची योजना समजली व तीला कळले की तिने काहीतरी केले पाहीजे. तिने राजा व हामानाला जेवणाच्या मेजवाणीसाठी बोलाविले, जेव्हा राजाने तिला म्हटले की ती त्याच्या राज्याच्या अर्ध्या पर्यंत काहीही मागू शकते. एस्तेर म्हणाली की तिची इच्छा आहे की तिच्या लोकांचे प्राण वाचावे; आणि हमान त्या सर्वांना मारू इच्छित होता.राजाला इतका राग आला की तो खोलीतून निघून गेला. जेव्हा तो खोलीत परत आला तेव्हा त्याला वाटले की त्याने हामानाला राणीवर वार करतांना पाहिले.रागात राजाने हामानाला त्याने त्याच्याच घरी तयार केलेल्या खांबावर फाशी

## लागूकरण

देव कधी कधी आपल्याला त्याच्यासाठी धैर्यवान होण्यासाठी व महत्वाच्या गोष्टी दावावर लावायला लावतो.

## देवाचा डीएनए

हया पाठात आपण देवाबद्दल काय शिकलो? देव त्याच्या लोकांना सोडवू इच्छितो आणि बरेचदा तो असाधारण शिष्यांचा उपयोग करतो.

## पाठांतर वचन

" मी तुला आज्ञा केली आहे ना? खंबीर हो, हिंमत धर,घाबरू नको, कचरू नका, कारण तू जाशील तिकडे तुझा देव परमेश्वर तुझ्याबरोबर असेल." यहोशवा 1:9.

## गृहपाठ

देवाने मला इतरांचे तारण करण्यासाठी निवडले असावे, आणि मला हया असल्या प्रसंगासाठी इथे ठेवले असेल. एका शेजा-याला सांगा की तुम्ही ख्रिस्ती आहात आणि विचारा की ते पुढील आठवडी तुमच्या बरोबर चर्चला येतील का?



## खेळ

### हामोन, मोरटेकाय, इस्टेर

हा खेळ दगड, कागद, कैची सारखाच आहे. इस्टर हामोनला मारतो, हामोन मोरटेकायवर हमला करते आणि मोरटेकाय इस्टेरला झाकतो.

मुलांना दोन गटात विभागा व मध्ये 4 फूटाची जागा ठेवा.प्रत्येक टीम ला ते काय होणार हे ठरविण्यासाठी थोडे दूर जाऊ दयाः हामोन, मोरटेकाय कि इस्टेर.

त्यांच्या गोल्यात, प्रत्येक गट ठरवेल की ते काय होवू इच्छितात, आणखी एक पर्यायी निवड. मग ते त्यांच्या 4 फूटाच्या जागेवर परत येवून उभे राहतील. तीन म्हटल्या बरोबर प्रत्येक संघ जे ते आहेत ते ओरडतील. जर एक संघ इस्टेर ओरडेल आणि दुसरी हामोन म्हणेल तर इस्टेर संघ हामोन संघाला सुरक्षित जागी हाकलेल. तुम्ही ते कोनने किंवा झाडा किंवा इतर वस्तूने नेमा. ज्या कोणाला पकडले जाईल तो प्रतिस्पर्धी संघाचा भाग होईल. जर दोन्ही संघ सारखेच ओरडतील तर ते परत दुस-या पर्याय घेवून ओरडतील.




## लूकसचा प्रयोग


विद्यार्थ्यांना दोन वेगवेगळया आकाराच्या पुंगळया व टेप वापरून उडणारे राकेट तयार करू दया. ते एका पुगळीतून हवा फुकणे व दुसरीचा उपयोग उडण्यासाठी करणे अशा प्रकारे ते काम करेल.सर्वात उंच, दूर किंवा अचूक कोणते उडते त्याची स्पर्धा करा. (व्हिडिओ पाहण्यासाठी किंवा सीबीआयकडे जाण्यासाठी या क्यूआर कोडचा वापर करा: लुकसचे यूट्यूबवरील प्रयोग )

## चर्चेसाठी प्रश्न :

आजच्या धड्याविषयी चर्चेत मोठ्या विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी सीबीआयच्या प्रश्नांचा वापर करा: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिका. त्याची उत्तरेही पुस्तिकेत देण्यात आली आहेत.

## विद्यार्थी पानांसाठी उत्तरे





→ -बाणाच्या दिशेने जा

✣ -तुम्हाला कोणत्या मार्गाने जायचे आहे ते निवडा.(↑↓←→)

☐ -ज्या दिशेने तुम्ही जात आहात त्याच दिशेने जा. वळू नका.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| व | न | भ | ती | घ | ण | य | ते |
| ध | र् | हा | मा | न | कु | ठि | फा |
| क | ठि | ण | ख | हृ | ले | ण | शी |
| ळू | अ | ह | श्व | रो | श | हृ | ए |
| प | स्ते | धै | र्य | वा | न | वि | चु |
| स | शी | म | वि | नी | ज | श्वा | ल |
| रा | ण | र्द | न | सू | स् | सू | ता |
| णि | ठि | ख | क् | ष | दे | हृ | ते |
| ए | स् | य | हृ | दी | व | ए | धै |
| मे | ज | वा | नी | द | ख | स्ते | र् |
| म | र् | द | ठ | वि | चा | र | त |

# घटना 6

## सुगावा #2 नाटक

एका रस्त्यावरील सफाई कामगाराने पोलिसांना बोलावून रस्त्यावर सापडलेल्या वस्तूची चौकशी केली आहे. रस्त्यावर सगळीकडे घाणेरड्या बँड-एड्स आणि पट्ट्यांचा मोठा, घृणास्पद गोंधळ आहे. असे दिसते की आजारी लोकांचा एक गट एकाच ठिकाणी थांबला आहे आणि त्यांचे सर्व बँड-एड्स आणि पट्टी काढून त्यांना रस्त्यावर सोडून गेले आहे.

## सुगावा #1 शीर्षक

बदललेल्या तब्येतीचे प्रकरण


## सुगावा #3 वस्तू

वर्गात ही दृष्य वस्तू सूगावा म्हणून आणाः पांढरे कापड.

## सुगावा #4 पुराण वस्तू संशोधन

यरूशलेमचे मंदीर आज असे दिसते. (गूपितः जिथे कुष्ठरोग्यांना ते बरे झाल्यावर जाऊन येशूची आज्ञा पाळण्यासाठी दाखवावे लागत असे.)





## सुगावा #5 पवित्र शास्त्रातील दृष्य

गूपितः 10 कुष्ठरोग्यासाठी दहा ताटं, भिंतीच्या बाहेर कारण कुष्ठरोग्यांना शहराबाहेर राहावे लागत असे.

## धडा दहा कुष्ठरोगी पवित्र शास्त्रामधूनः लूक 17:11-19



त्याच्या गावाच्या जवळ येशू शमरोन व गालील मधील येरूशलेमच्या रास्त्यावर चालत होता. जसा तो शहरांत प्रवेश करत होता, 10 माणसे ज्यांना कुष्ठरोग झाले होते त्यांनी दुरून त्याला हाक मारली, "येशू प्रभू, आमच्यावर दया करा!" कुष्ठ रोग असा रोग आहे तो तुमच्या हाताचे, पायाचे बोटं व नाक आणि कान हयांना जखम करते आणि तुम्ही नेहमी अशुध्द आहात असे म्हणण्यासाठी भाग पाडते. जेव्हा येशूने त्यांना पाहीले तेव्हा त्याने त्यांना सांगितले की," जा जाऊन स्वतःला
याजकाला दाखवा." मोशेच्या नियम शास्त्रानुसार, जर ते बरे झाले तर ते पुन्हा समाजाचा भाग होवू शकत होते आणि ते पुन्हा मंदीरात जाऊन भक्ति करू शकत होते. ते अजून बरे झाले नव्हते, म्हणून ते खूप विचित्र वाटले असेल.

ते यरूशलेम कडे जाऊ लागले आणि ते चालत असतांना ते बरे झाले व शुध्द झाले! त्यातील एक जो विदेशी होता त्याने पाहीले की तो शुध्द झाला आहे व लगेच येशूकडे परत आला.त्याने दुरून येत असता देवाची स्तुति केली परंतू येशूच्या जवळ येऊन त्याच्या पाया पडला व त्याचे आभार मानले.येशूला आश्चर्य वाटले की त्याने सर्वांना बरे केले होते आणि त्याने त्या मनुष्याला विचारले, "दहा शुध्द झाले होते ना? बाकीचे नऊ कुठे आहेत? हया परक्या वाचून इतर कोणीही देवाचे गौरव केले नाही का? मग येशूने जो बरा झालेला एक आभार मानणारा होता त्याला प्रोत्सिाहित केले व म्हटले, जा तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे."

## लागूकरण

कुष्ठरोग्यांप्रमाणेच मी सुध्दा देवाने माझ्यासाठी जे केले त्यासाठी त्याचे आभार मानले पाहीजे.

## देवाचा डीएनए

हया पाठातून आपण देवाबद्दल काय शिकतो? देवाला त्याच्या लोकांकडून आज्ञापालन व आभारी वृत्ती हवी आहे.

## पाठांतर वचन

“सर्व स्थीतीत उपकारस्मरण करा, कारण तुम्हांविषयी ख्रिस्त येशूमध्ये देवाची इच्छा हीच आहे.” 1 थेस्सलनी 5:18

## गृहपाठ

ज्या तीन गोष्टींसाठी तुम्ही अजून देवाचे आभार मानण्याचा विचार केला नाही त्याची यादी करा. ज्या गोष्टींसाठी आपण सहसा देवाचे आभार मानतो त्या म्हणजे अन्न, वस्त्र व कुटुंब. तुमच्या विद्यार्थ्यांना आभारी होण्यासाठी नविन कल्पनांचा विचार करायला सांगा; हरवलेली वस्तू शोधण्यासाठी मदत केल्याबद्दल, शाळेत सुखरूप् पोहचे पर्यंत पाऊस थांबविल्या बद्दल, आज पडल्यावाचून गाडी चालविता आल्या बद्दल, आज तुमच्या भाऊ, बहिणीला चांगल्या गोष्टी बोलता आल्या बद्दल इ.



## खेळ काठी पकडा

सर्व खेळाडू मध्यभागी एका खेळाडूभोवती वर्तुळ तयार करतात. वर्तुळातील प्रत्येक व्यक्तीला एक क्रमांक दिला जातो. मध्यवर्ती खेळाडू लांब लाकडी काठी (अंदाजे १.५ मीटर लांब) सरळ धरून एका बोटाने धरून उभा राहतो. कोणताही इशारा न देता तो काठीवरून बोट उचलतो आणि त्याच क्षणी एका नंबरवर हाक मारतो.

ज्याला तो नंबर दिला जातो तो पुढे धावतो आणि काठी जमिनीवर आदळण्यापूर्वी पकडण्याचा प्रयत्न करतो. जर त्याने तो पकडला तर तो मध्यवर्ती खेळाडू बनतो. जर त्याला पकडण्यात अपयश आले तर तो वर्तुळात परत येतो.




## लूकसचा प्रयोग

विद्यार्थ्यांनी कार्डचा तुकडा कमानीत वाकवून, टेबलावर ठेवून त्याखाली फुंकून हळू हळू जाणाऱ्या हवेपेक्षा वेगाने जाणाऱ्या हवेचा दाब कसा कमी असतो हे पहावे. विमानाच्या पंखाच्या वरची वेगवान हवा च त्याला हवेत उचलते.
(व्हिडिओ पाहण्यासाठी किंवा सीबीआयकडे जाण्यासाठी या क्यूआर कोडचा वापर करा: लुकसचे यूट्यूबवरील प्रयोग)


## चर्चेसाठी प्रश्न :

आजच्या धड्याविषयी चर्चेत मोठ्या विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी सीबीआयच्या प्रश्नांचा वापर करा: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिका. त्याची उत्तरेही पुस्तिकेत देण्यात आली आहेत.

# विद्यार्थी पानांसाठी उत्तरे



→ -बाणाच्या दिशेने जा
✣ -तुम्हाला कोणत्या मार्गाने जायचे आहे ते निवडा. (↑↓←→)
☐ -ज्या दिशेने तुम्ही जात आहात त्याच दिशेने जा. वळू नका.



| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| य | र् | व | का | ही | आ | र | दा | ख | वि | णे | ए |
| रू | न्य | बरे | हो | णे | भा | य | ली | य | दे | णे | चु |
| श | र् | व | त | ख् | र | स् | त | कु | शी | य | ल |
| ले | गा | ली | आ | ज्ञा | पा | ल | न | म | आ | ठ | ता |
| म | कु | ष्ठ | रो | गी | द | ए | दा | ध | न्य | वा | द |
| म | हा | न | ग्य | या | ज | क | क् | ति | बरे | व | हा |
| व | रे | ल | दा | कृ | पा | ळू | प | ख्रि | स्त | श् | आ |
| भ | क्ति | ति | कु | ष् | ठ | गा | ली | ल | आ | वा | भा |
| पु | न | रू | त् | थ् | थी | त | क् | ति | य | स | य |

# घटना 7

## सुगावा #1 शीर्षक

दिसणार्या मांजरींचे प्रकरण

## सुगावा #2 नाटक

आजोबांच्या आजोबांच्या आजोबांच्या आजोबांसोबत एक तरुण मुलगा शेतात आहे! मुलगा त्या वृद्ध माणसाला विचारतो आहे की त्यांच्या सुरुवातीच्या आठवणी काय आहेत - त्याला आठवते का की तेथे डोंगर कसे आले? खूप म्हातारा हसतो आणि मुलाला सांगतो की तो म्हातारा आहे पण मातीइतका म्हातारा नाही! त्याला आता नदी बनलेले पाण्याचे झरे आठवतात, पण त्याची सर्वात जुनी आठवण म्हणजे वधूसोबत बसून सर्व प्राणी एकत्र खेळताना पाहणे. त्याला आशा आहे की एक दिवस मुलगा प्राण्यांना एकत्र येऊन खेळताना पाहेल.


## सुगावा #3 वस्तू

वर्गात ही दृष्य वस्तू सूगावा म्हणून आणाः फूल

## सुगावा #4 पुराण वस्तू संशोधन

आज बगदाद मध्ये असलेल्या टीगरीस नदीचे चित्र. (गुपितः हया क्षेत्राचे वर्णन उत्पत्ती 2 मध्ये केलेले आहे.)



## सुगावा #5 पवित्र शास्त्रातील दृष्य

गूपीतः सर्व निर्मीती पूरावा/ प्रमाण आहे.

## धडा निर्मीती पवित्र शास्त्रामधूनः उत्पत्ती 1



सातव्या दिवशी देवाने काम केल्यानंतर विश्रांती घेतली त्याने पाहीले की त्याने निर्माण केलेले सर्व काही चांगले आहे आणि त्याने विसावा घेतला.परंतू सुरवातीची आठवण करीत असतांना, पहिल्या दिवशी देवाने म्हटले,"प्रकाश होवो आणि प्रकाश झाला". दुस-या दिवशी देवाने म्हटले, "आकाश होवो" आणि आकाश झाले. तिस-या दिवाशी देव अत्यंत व्यस्त होता आणि त्याने जमीन व त्यावरील सर्व वनस्पती निर्माण केल्या. त्यात प्रत्येक फूल, झाड आणि गवताचा प्रकार होता आणि देव बोलला की हे चांगले आहे.चौथ्या दिवशी देवाने रात्र व दिवस तसेच ऋतू होण्यासाठी सूर्य आणि चंद्र निर्माण केले. त्याने रात्री चमकण्यासाठी कोटयावधी तारेही निर्माण केले. पाचव्या दिवशी समुद्रातील सर्व प्राणी आणि हवेतील सर्व पक्षी तयार झाले आणि देवाने त्यांना म्हटले फलद्रूप व्हा आणि बहूगुणित व्हा. सहाव्या दिवशी सर्व लाहन मोठे प्राणी व जमिनीवर रांगणारे प्राणी निर्माण झाले. आणि मग देवाने मनुष्य निर्माण केला. त्याने माती पासून तो तयार केला व त्याच्या नाकपूडयात श्वास फुंकला आणि मनुष्य निर्माण झाला! त्याने त्याला सर्व प्राणी व वनस्पती हयांच्यावर अधिकार दिला. देवाने एक विशेष बाग तयार केली व आदामाला तिच्यात ठेवले. जेव्हा आदाम झोपी गेला तेव्हा देवाने ठरविले की तो एकटा असावा हे बरे नाही, म्हणून त्याने त्याची फासळी काढली व हवेला निर्माण केले. मग देवाने त्यांना बहूगुणीत होवून पृथ्वी व्यापून टाकण्याची आज्ञा दिली आणि सातव्या दिवशी त्याने विसावा घेतला.

## लागूकरण

आदामाप्रमाणेच मी सुध्दा माझ्या आजूबाजूच्या निर्मीतीची काळजी घेण्यासाठी जवाबदार आहे.

## गृहपाठ

आपल्या घरातील किंवा आपण राहत असलेल्या ठिकाणी एखाद्या झाडाला पाणी द्या आणि त्याच्या सभोवतालचे तण/ लहान वनस्पती काढून टाका, जेणेकरून ती चांगली वाढेल.

## पाठांतर वचन

" देव त्यास म्हणाला, फलद्रूप व्हा, बहूगुणित व्हा, पृथ्वी व्यापून टाका व ती सत्तेत आणा; समुद्रतील मत्स्य, आकाशांतील पक्षी व पृथ्वीवर संचार करणारे सर्व प्राणिमात्र यांवर सत्ता करा." उत्पत्ती 1:28



## देवाचा डीएनए

हया पाठातून आपण देवाबद्दल काय शिकतो? देवाने सर्वकाही निर्माण केले.



## खेळ निर्मीतीचा खेळ

एका कागदावर सूर्य आणि चंद्र हे शब्द लिहा; जी मुले वाचण्यासाठी खूप लहान आहेत त्यांच्यासाठी चित्र काढा. व ते खोलीच्या भिंतीवर किंवा जमीनीवर लावा. आणखी ज्या गोष्टींची यादी उत्पत्तीच्या पुस्तकात दिली आहे त्यांचे चिन्ह तयार करा जसे, पक्षी, मासे, झाड, तळे इ.खेळ खेळण्यासाठी शिक्षक एखादया गोष्टीचे नावे घेतो आणि मुलं त्याचे चित्र घेऊन त्या चित्राकडे धावतात. जो मुलागा सर्वात शेवटी तिथे पोहचेल तो बाद होईल व खाली बसेल. लहान मुलांना देवाने निर्मीतीच्या वेळेस जे तयार केले त्या गोष्टीकडे धावत असतांना त्या प्राण्यासारखा अभिनय करायला आवडेल.




## लूकसचा प्रयोग


मुलांना खोलीत लेबल असलेल्या पाच गोष्टी व लेबल नसलेल्या पाच गोष्टी शोधायला लावा. लक्षात घ्या की लोक वस्तूवर लेबल लावतात आणि देव तसे करीत नाही. (व्हिडिओ पाहण्यासाठी किंवा सीबीआयकडे जाण्यासाठी या क्यूआर कोडचा वापर करा: लुकसचे यूट्यूबवरील प्रयोग)

## चर्चेसाठी प्रश्न :

आजच्या धड्याविषयी चर्चेत मोठ्या विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी सीबीआयच्या प्रश्नांचा वापर करा: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिका. त्याची उत्तरेही पुस्तिकेत देण्यात आली आहेत.

## विद्यार्थी पानांसाठी उत्तरे





पांढ-या चैकणावर सुरवात करा आणि मग काळया चैकणाला स्पर्श करत जा. मग पांढ-या, काळया, पांढ-यावर असे करत पुढे जा. एका कोप-यातून दुस-या कोप-याकडे जावू नका.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ज | हा | ज | झा | व | न | चं | क् |
| ता | च | द् | डं | प | र् | द्र | झा |
| रे | सू | नि | र्मा | ण | क | र | णे |
| झा | र्य | शे | जा | री | दि | व | स |
| दी | प | र्व | त | गा | ली | ल | हा |
| द्र | क्षी | झा | ला | क् | मा | व | ह |
| षी | रे | दे | व | श | से | डं | वा |
| डं | न | ण | क | आ | दा | म | रे |
| द् | दी | अ | ह | श् | व | रो | श |

# घटना 8

## सुगावा #2 नाटक

आजारी माणसाची तपासणी करण्यासाठी डॉक्टर नोकरांच्या क्वार्टरमध्ये आले आहेत, पण गार्ड त्याला आत जाऊ देत नाही. तो म्हणतो आता आत येण्याची गरज नाही. डॉक्टर गोंधळलेआहेत, आजारी माणसाने विश्रांती घेतली आहे की नाही हे तपासणे आवश्यक आहे - काय झाले आहे? गार्ड त्याला सांगतो की डॉक्टरांची नेमणूक बदलली आहे - "येण्याची" आज्ञा बदलून "जा" करण्यात आली आहे आणि बॉसनेच आदेश बदलले.

## सुगावा #1 शीर्षक

पीडितेच्या तब्येतीत थोडासा बदल करण्याचे प्रकरण

## सुगावा #3 वस्तू

वर्गात ही दृष्य वस्तू सूगावा म्हणून आणाः औषध


## सुगावा #4 पुराण वस्तू संशोधन

रोमी शिपायांचे नाट्य प्रर्दशनाचा फोटो.लाल पिसं असलेले शताधिपती असतात जे 100 पायदळ शिपायांचे अधिकारी असतात. (गूपितः जो शताधीपती येशू बरोबर बोलला तो असा असेल.)




## सुगावा #5 पवित्र शास्त्रातील दृष्य

गूपितः रिकामा पलंग, ताट, प्याला आणि तापमापक, जे आजारी व्यक्तिचे सूचक आहे, घर व लोक जिथे होते हयांच्यातील अंतर कारण येशूने त्याला दूरून बरे केले.



## धडा शताधीपतीचा विश्वास पवित्र शास्त्रामधून: लूक 7:10



सेवकांचा एक गट येशूकडे आला व लगेच त्याला सांगितले की त्यांच्या मालकाचा एक सेवक आजारी आहे. त्यांचा मालक हा रोमी शताधीपती होता. तो इतर 100 शिपायांचा नायक होता आणि त्याचा आवडता सेवक आजारी होता व मरण्याच्या बेतात होता. येशू शताधिपतीच्या घराकडे जात असतांना आणखी एक गट त्याच्या कडे आला. शताधिपतीने हया गटाला येशूकडे पाठविले होते हे म्हणून की तुम्ही माझ्या विनंतीला मान दयावा हया लायक मी नाही, तुम्ही माझ्या घरी यावे याचीही माझी लायकी नाही. म्हणूनच मी स्वतः तुमच्या कडे आलो नाही. परंतू तुम्ही शब्द मात्र बोला आणि माझा चाकर बरा होईल्.मी अधिकाराधीन मनुष्य आहे व मला इतरांवर अधिकार आहे. जर मी माझ्या शिपायांना ये म्हटले तर ते येतात व जा म्हटले तर ते जातात. जे काही मी त्यांना सांगतो ते ते करतात. शताधिपतीला येशू कडे असलेला अधिकार समजला व त्याला माहीत होते की येशू जे काही बोलेल ते घडेल. जेव्हा येशूने हे ऐकले तेव्हा त्याला आश्चर्य वाटले व तो म्हणाला, "एवढा विश्वास मला इस्त्राएलातही आढळला नाही." त्या संध्याकाळी जेव्हा शताधिपतीचे सेवक घरी आले तेव्हा त्यांना दिसले कि आजारी मरणप्राय सेवक बरा झाला आहे.

## लागूकरण

शतीधिपती प्रमाणे माझा विश्वास जे माझ्या जवळ नाहीत त्यांच्यासाठी परिस्थिती बदलू शकतो.

## गृहपाठ

एखादया मित्राला किंवा नातेवाईकाला पत्र लिहा व त्यांना विचारा की ते कसे आहेत आणि तुम्ही त्यांच्यासाठी कशाबद्दल प्रार्थना करू शकता?

## पाठांतर वचन

" हया गोष्टी ऐकून येशूला त्याचे आश्चर्य वाटल आणि तो वळून आपल्यामागे चालणा-यां लोकसमूदायाला म्हणाला, मी तुम्हांस सांगतो एवढा विश्वास इस्त्राएलांतही मला आढळला नाही. "
लूक 7:9



## देवाचा डीएनए

हया पाठातून आपण देवाबद्दल काय शिकतो?
देव सर्वोच्च अधिकार आहे



## खेळ

### बिन बॅग खेळ

शिक्षक खेळासाठी काही तातपुरत्या बिन बॅग तयार करू शकतात. त्या तयार करण्यासाठी काही प्लास्टिकच्या पिश्व्या दुमडा(किंवा एकात एक घाला) त्याल एक कप भर सूके कडधान्य किंवा तांदूळ टाका आणि ते बाहेर पडू नये म्हणून त्याला वर गाठ बांधा.

•मुलं हळूच ही पिश्वी हवेत फेकतील व झेलतील.
•मुलं दुस-या मुलाकडे ही पिश्वी फेकतील जो कोणी ती झेलेल तो थोडा मागे उभा राहील जेणे करून फेकण्यासाठी व झेलण्यासाठी थोडा त्रास होईल, मग ती पिश्वी पुन्हा फेकणा-या व्यक्तिकडे फेका.

मोठया मुलांसाठी अधिक कल्पना:
•मुलं पिशवी वर फेकल्यानंतर टाळी वाजवतात व नंतर ती झेलतात.
•मुलं ते आणखी कठिण करतात, एक हात मागे करून एकाच हाताने पिश्वी फेकण्याचा व झेलण्याचा प्रयत्न करतात.



## लूकसचा प्रयोग


तुमच्या विदयार्थ्यांना फूगे फूगवून ते डोक्यावर घासू दया जेणे करून स्थीर उर्जा/ वीज तयार होईल. फूगा भिंतीवर लावा आणि तो कसा चिटकून राहतो ते पहा केवळ स्थीर उर्जाच्या सहायाने. (व्हिडिओ पाहण्यासाठी किंवा सीबीआयकडे जाण्यासाठी या क्यूआर कोडचा वापर करा: लुकसचे यूट्यूबवरील प्रयोग)

## चर्चेसाठी प्रश्न :

आजच्या धड्याविषयी चर्चेत मोठ्या विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी सीबीआयच्या प्रश्नांचा वापर करा: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिका. त्याची उत्तरेही पुस्तिकेत देण्यात आली आहेत.

## विद्यार्थी पानांसाठी उत्तरे





खाली दिलेल्या रकान्यातील चित्राच्या अगदी विरूद्ध चित्र तुम्ही शोधू शकता का? प्रत्येक जोडीमध्ये एक रेष आखा.

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दे | ण | गी | त् | शि | र् | ता | व | वि | ये | यो |
| आ | श्च | र्य | प्रि | पा | य | श् | शि | श्वा | शू | रा |
| रो | न | ळ | का | ई | दे | खा | वा | स | ई | पा |
| ग्य | से | ना | प | ती | ब | रा | स | ले | च | से |
| श्वा | ग | रूं | कु | ग | घ | व | त् | म | र् | ग |
| प्रि | यो | स | फ | दू | र | चे | | | | |
| ब | रा | झा | ला | व | स्ता | पा | | | | |
| श् | पा | श | शि | श् | ता | श् | | | | |
| से | त्र | ले | वा | म | हा | न | | | | |
| प् | प्रि | ती | ई | दे | खा | से | | | | |

# घटना 9

## सुगावा #1 शीर्षक

अंधाळेपणाच्या विलक्षण हल्ल्याची घटना

## सुगावा #3 वस्तू

वर्गात ही दृष्य वस्तू सूगावा म्हणून आणाः काळा चष्मा.

## सुगावा #2 नाटक

स्ट्रेट स्ट्रीटवरील एका सराईत आरोग्य सेवेच्या कामाच्या अहवालाची चौकशी करण्यासाठी एक सरकारी निरीक्षक आले आहेत. तो सराईत थांबलेल्या एका प्रवाशाबद्दल सराईला प्रश्न विचारतो. सराय म्हणतो की प्रवासी एका गटासह आला होता परंतु त्याच्या खोलीत प्रार्थना करत होता आणि त्याला डॉक्टरांना बोलवायचे नव्हते. तेवढ्यात एक माणूस आला होता, त्या प्रवाशाला स्पर्श केला होता, काही शब्द बोलला होता आणि मग त्याला धुवून पुन्हा निघून गेला होता. इन्स्पेक्टरला काही वैद्यकीय वस्तू वापरण्यात आल्या आहेत का हे जाणून घ्यायचे आहे परंतु सराईदार तेथे काहीही नसल्याचा इन्कार करतो. ते असेही म्हणतात की हे सर्व खूप गोंधळात टाकणारे होते कारण त्यांना वाटले की ते शत्रू असतील परंतु ते मित्रांसारखे वागले!

## सुगावा #4 पुराण वस्तू संशोधन

तरससच्या व्यस्त शहराचा फोटो जिथे आज 2 00,000 रहिवासी आहेत, भूमध्य सागरा पासून काही अंतरावर असलेले. (गूपितः प्रेषित पौल तारसस शहरात राहणारा होता.)



## सुगावा #5 पवित्र शास्त्रातील दृष्य

गूपितः सरळ म्हटलेला रस्ता, कारण येशू ख्रिस्ताने शौलाला तिथे पाठविले आणि शौलासाठी एक काठी कारण तो देवाची आज्ञा पाळल्यामूळे अंधळा होता.




## धडा

**पौलाचा पालट पवित्र शास्त्रामधूनः प्रेषित 9:1-19**



येशूचा शिष्य होण्याआधी पौल वाईट मनुष्य होता, आणि जो कोणी येशूचा शिष्य होता त्याचा तो राग करित असे. त्याने असेही म्हटले की तो सर्वात वाईट पापी होता! पौलाला परवांगी होती की तो कोणत्याही ख्रिस्ती व्यक्तिला येशूवर प्रिती केल्यामूळे तुरूंगात पाठवू शकत होता. एक दिवस तो दिमिष्काच्या रस्त्यावरून जात असतांना, तो ख्रिस्ती लोकांना तुरूगात टाकण्यासाठी शोधत होता.
अचानक एक तेजस्वी प्रकाश दिसला आणि पौल जमीनीवर पडला. त्याला एक वाणी ऐकू आली जी म्हणाली, ”पौला माझा छळ का करतोस?“ त्याला माहीत करायाचे होते की त्याच्या बरोबर कोण बोलत आहे, आणि त्याला लगेच उत्तर मिळाले, ”ज्या येशूचा तू छळ करतोस तो मी आहे, उठ आणि शहरात जा.“
पौल उभा राहीला तेव्हा त्याच्या लक्षात आले की त्याला दिसत नव्हते! येशूने त्याला आंधळे केले होते! पौला बरोबर काही मित्र होते आणि त्यांनी त्याला शहरात जाण्यासाठी मदत केली. तिथे असतांना त्याने काहीच खाल्ले किंवा प्याला नाही. देव त्याचा शिष्य अननायस हयाच्या बरोबर बोलला. देवाची इच्छा होती की अननायसाने जाऊन पौलाचे आंधळेपण दूर होण्यासाठी प्रार्थना करावी. अननायसाला आश्चर्य वाटले; त्याला माहीत होते की भूतकाळात पौल ख्रिस्ती लोकांबरोबर चांगला वागत नसे आणि त्याने देवाला सर्वकाही सांगितले. देवाने अननायसाला उत्तर दिले की त्याने पौलाला विदेशी लोकांना व इस्त्राएल राष्ट्राला देव त्यांच्यावर प्रिती करतो हे सांगण्यसाठी निवडिले आहे. आज्ञा पाळून अननायस पौलासाठी प्रार्थना करण्यासाठी गेला.अननायसाने पौलावर प्रार्थनेत हात ठेवल्यानंतर पवित्र आत्मा पौलावर आला व त्याच्या डोळयाचा आंधळेपणा गेला. पौलाचे मन बदलले आणि त्याने लगेच जाऊन बाप्तिस्मा घेतला.



## लागूकरण

मी माझ्या शत्रूंवर प्रिती करीन.

## गृहपाठ

जे तुमच्या बरोबर चांगले वागले नाही त्यांच्यासाठी लहानसे बक्षीस घ्या व त्यांना दया.

## पाठांतर वचन

" मी तर तुम्हास सांगतो तुम्ही आपल्या वै-यावर प्रिती करा आणि जे तुमचा छळ करितात त्यांच्यासाठी प्रार्थना करा.
" मत्तय 5:44.

## देवाचा डीएनए

हया पाठातून आपण देवाबद्दल काय शिकतो? देव त्याचे अस्तीत्व लोकांना प्रगट करू इच्छितो.



## खेळ शौला सारखे अंधळे

शिक्षक एखाद्या विद्यार्थ्याच्या डोळ्यांवर पट्टी बांधेल जो दुसर्या विद्यार्थ्याला टॅग / पकडेपर्यंत हलेल ज्याला पकडल्यावर थोडा आवाज करावा लागेल. डोळ्यावर पट्टी बांधलेला विद्यार्थी याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न करतो की विद्यार्थी कोण आहे. जे विद्यार्थी पकडले जाणे टाळत आहेत त्यांनी हळूहळू आणि शांतपणे खोलीभोवती फिरावे. प्रीस्कूल - 2 चे संघ आहेत, प्रत्येक संघाच्या डोळ्यावर पट्टी बांधली जाते. एक विद्यार्थी डोळ्यावर पट्टी बांधतो आणि दुसरा शिक्षकाने वर्गापूर्वी ठरवून दिलेल्या साध्या अडथळ्याच्या कोर्समधून मुलाला घेऊन जाण्यास मदत करतो.

## लूकसचा प्रयोग





विद्यार्थ्यांनी दोन पेपर कप, दोन पेपर क्लिप्स आणि एक लांब दोरी वापरून खेळणी "सेल फोन" (मोबाईल) तयार करावेत. दोन कप त्यांच्या मधल्या लांब दोरीने जोडून घ्या आणि संपूर्ण खोलीत बोला - एक त्याच्या कपमध्ये बोलतो आणि दुसरा त्याच्या कपने ऐकतो. (व्हिडिओ पाहण्यासाठी किंवा सीबीआयकडे जाण्यासाठी या क्यूआर कोडचा वापर करा: लुकसचे यूट्यूबवरील प्रयोग)

## चर्चेसाठी प्रश्न :

आजच्या धड्याविषयी चर्चेत मोठ्या विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी सीबीआयच्या प्रश्नांचा वापर करा: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिका. त्याची उत्तरेही पुस्तिकेत देण्यात आली आहेत.

## विद्यार्थी पानांसाठी उत्तरे





| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ते | ज | स्वी | वी | प | ळ | श | त् | रू | न |
| ह् | न | ह्न | न्या | ढ | प् | रा | प्रा | र्थ | ना |
| त् | से | स | थ | गू | प्र | ख्रि | स्ती | गू | प |
| र् | व | ख | प | द् | का | क | ब | ढ | ता |
| ळ | क | ते | ब | न्या | श | त्रू | न् | झा | र |
| पौ | वी | या | रा | द्वे | अं | ध | ळे | प | ण |
| ख | रू | ख्रि | झा | श | ख | म | क | ब | रू |
| ह | ल्ला | के | ला | के | रू | द | न् | या | त् |
| अं | ध | पौ | ल | ला | रा | त | वी | प | र् |

पौल
द्वेश केला
ख्रिस्ती
हल्ला केला
तेजस्वी
प्रकाश
अंधळेपण
गूढ
शत्रू
हनन्या
प्रार्थना
मदत
तारण
सेवक
बरा झाला

# घटना 10

## सुगावा #1 शीर्षक

निनावी हळू बोलणारा किंवा कुजबूजणारा.

## सुगावा #2 नाटक

एका व्यक्तीने पोलिसांच्या आपत्कालीन हेल्पलाईनवर फोन केला आहे कारण त्याला सांगण्यात आले आहे की कोणीतरी त्याला आणि त्याच्या भावाला ठार मारणार आहे! दुसरा भाऊ, जो त्यांचा खरा भाऊ नाही, त्याने वडिलांना सांगितले होते की दोन्ही भाऊ एकाच वेळी मरतील आणि देवच त्या दोघांचा मृत्यू घडवून आणणार आहे! संदेश देणाऱ्या भावाला पोलीस ओळखतो, तो विश्वासू पुजारी आहे - त्याचा सल्ला असा आहे की जाऊन वडिलांकडे मदत मागावी. शेवटी, जर तुम्ही देवाच्या विरोधात पाप केले तर पोलीस तुम्हाला मदत करू शकणार नाहीत!

## सुगावा #3 वस्तू

वर्गात ही दृष्य वस्तू सूगावा म्हणून आणाः कान स्वच्छ करण्याचे बड किंवा कान कोरणे.


## सुगावा #4 पुराण वस्तू संशोधन

एली हा इथामारच्या वंशातला अहरोनाचा पुत्र होता. तो इस्त्राएलाचा शास्त्रा व मुख्य याजक म्हणून काम करित होता जेव्हा दहा आज्ञा असलेला कराराचा कोष शिलोह इथे होता तेव्हा. (गूपितः शमूवेलाच्या काळात याजक कसे कपडे घालत असत त्याचा फोटो, पवित्र शास्त्रातील एली सारखा.)




## सुगावा #5 पवित्र शास्त्रातील दृष्य

गूपितः निवासमंडपातः दिवा, मेज व त्यावर भाकर, धूप, पडदा आणि कोष. आणखी एक उशी व पांघरून कारण शमूवेल जमीनीवर झोपत असे.1 शमूवेल 3:3



## धडा शमूवेल देवाचे ऐकतो पवित्र शास्त्रा मधूनः 1 शमूवेल 3:1-18



शमूवेल विशेष मुलगा होता, देवाने त्याला त्याच्या कार्यासाठी वेगळे केले होते. तो एलीच्या सोबत निवास मंडपात लहानाचा मोठा झाला होता आणि शमूवेल एली बरोबर विश्वासू होता. देवाची आज्ञा पाळण्यासाठी शमूवेल होईल ते करीत असे. त्या काळात देव त्याच्या लोकांशी ज्यास्त बोलत नसे आणि शमूवेलाने कधी देवाची वाणी ऐकली नव्हती. म्हणून ज्या रात्री देवाने शमुवेलाला हाक मारली तेव्हा त्याला वाटले की एली त्याला बोलावित आहे. काहीतरी वाईट घडले असेल असा विचार करून तो एलीकडे धावत गेला. एली म्हणाला की त्याने शमूवेलाला हाक मारली नाही त्याने जाऊन झोपावे. शमूवेल झोपला आणि त्याला कोणीतरी पुन्हा हाक मारल्यासारखे वाटले तो पुन्हा एलीकडे धावत गेला, त्याला एली ने सांगितले की मी तुला बोलाविले नाही तू पुन्हा झोप. पुन्हा शमूवेलाला कोणी तरी हाक मारली आणि पुन्हा तो एलीकडे धावत गेला. परंतू हया वेळेस एलीची प्रतीक्रिया वेगळी होती. त्याने शमूवेलाला सांगितले की देव त्याला हाक मारत असावा आणि परत जर असे झाले तर त्याने देवाला म्हणावे,"बोल प्रभू तुझा दास ऐकत आहे." पुन्हा एकदा शमूवेल झोपी गेला आणि त्याला कोणी तरी हाक मारली म्हणून तो उठला. तो बिछान्यावर उठला आणि म्हणाला,"बोल प्रभू तुझा दास ऐकत आहे." देवाने शमूवेलाला सर्व प्रकारच्या गोष्टी सांगून उत्तर दिले. एक गोष्ट देवाने शमूवेलाला सांगितली ती म्हणजे कशा प्रकारे एलीच्या दोन मुलांचा नाश होईल.देव शमूवेलासोबत बोलला आणि शमूवेल हया वेळेस ऐकत होता.

## लागूकरण

जेव्हा मी देवाचे ऐकतो तेव्हा देव माझ्या बरोबर बोलतो.

## देवाचा डीएनए


हया पाठातून आपण देवाबद्दल काय शिकतो? देव त्याच्या लोकांसोबत बोलू इच्छितो.

## पाठांतर वचन

" त्याला द्वार पाळ दार उघडितो, मेंढरे त्याची वाणी ऐकतात, तो आपल्या मेंढरांस ज्याच्या त्याच्या नावाने हाक मारितो व त्यांस बाहेर नेतो. "
योहान 10:3

## गृहपाठ

हया आठवडयात काही मोठया मुलांची भेट घ्या शमूवेलासारखे असे कोणीतरी शोधा ज्याने देवाची वाणी ऐकली आहे. त्यांना विचारा, "देव तुमच्याशी कधी बोलला आहे का? तो कसा बोलला? तुम्हाला कसे कळले की देव बोलत आहे."



## खेळ ऐकण्याचे खेळ

शिक्षक मुलांना विचारतात की ते उत्तम ऐकणारे आहेत का. खालिल गोष्टीचा उपयोग हे दाखवून देण्यासाठी करा की ते ऐकत नाहीतः

•जर तुम्ही 3 पैकी दोन सफरचंद घेतले तर तुमच्या कडे काय आहे?( एक सफरचंद नाही परंतू 2, कारण ते तुमच्या जवळ आहेत.)

•माझ्या मागे उडया मारत 5 वेळेस म्हणाः हॉप, हॉप, हॉप, हॉप, हॉप. तुम्ही रस्त्यावर हिरवा लाईट लागल्यावर काय करता.(जातो हे उत्तर आहे थांबतो हे नाही.)

•वेगवेगळे आवाज असलेली सीडी वापरा टाळया वाजवीणे, शिंगाचा आवाज, पाऊस इ. (किंवा हे आवाज तुमच्या फोनमध्ये आॅनलाइन शोधा.) जेव्हा मुलं हा आवाज ओळखतील तेव्हा त्यांनी हात वर करावा असे सांगा. तुमच्या फोनवर हे आवाज एका वेळेस एक वाजवा आणि मुलांना ते ओळखायला लावा.

•मुलांना चार चारच्या गटात विभागा, प्रत्येकाला 1,2,3,4 असे नंबर दया. एका टेबलावर किंवा खूर्चीवर नाणे, पेन्सिल, दगड, पेपर किंवा रिकामी कवर ठेवा. मुलांना वाचण्यासाठी आधीच निर्देश लिहून ठेवा. एक नंबरने चार नंबरला नाणे दयावे. नंबर तीन ने 1 नंबर ला पेन्सिल देवू नये. उद्देश हा आहे की मुलांनी तंतोतंत आज्ञा पाळावी. शेवटी हे पहा की कोणाकडे कोणती वस्तू आहे. शिक्षक वेगवेगळे शब्द किंवा वस्तू वापरून विविधता आणू शकतात जसेः घ्या, दे, उचला, बाजूला दया, स्वतःकडे घ्या, अदला बदली करा.

## लूकसचा प्रयोग


एका मुलांच्या डोळयावर पट्टी बांधा आणि त्याला वर्गातील हळू बोलणे कोणत्या दिशेने येत आहे ते ओळखायला लावा. आणखी बदल करण्यासाठी पट्टी बांधलेल्या मुलाचा एक कान बंद करा किंवा इतर मुलांनी हळू बोलण्याएवजी शिट्टी वाजवावी. (व्हिडिओ पाहण्यासाठी किंवा सीबीआयकडे जाण्यासाठी या क्यूआर कोडचा वापर करा: लुकसचे यूट्यूबवरील प्रयोग)




## चर्चेसाठी प्रश्न :

आजच्या धड्याविषयी चर्चेत मोठ्या विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी सीबीआयच्या प्रश्नांचा वापर करा: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिका. त्याची उत्तरेही पुस्तिकेत देण्यात आली आहेत.

## विद्यार्थी पानांसाठी उत्तरे





→ -बाणाच्या दिशेने जा
-तुम्हाला कोणत्या मार्गाने जायचे आहे ते निवडा. (↑↓←→)
-ज्या दिशेने तुम्ही जात आहात त्याच दिशेने जा. वळू नका.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भ | स | बो | कू | आ | श् | च | र् |
| छा | मू | ल | गा | ज | मू | वे | ले |
| ऐ | क | ले | आ | व | बू | भ | ख् |
| कू | ज | बू | ठ | र | भू | ज | व |
| ज | स | र् | व | का | ही | र् | णे |
| ण | ल | ल | ण | व | ल | दे | भ |
| अ | नो | ळ | खी | श | ऐ | वा | णी |
| मी | स | र्व | का | ही | बि | ची | ढ |
| मू | श | मू | वे | ल | छा | ल | मू |
| क | आ | ल | ठ | व | ना | ल | क |
| ती | सु | आ | प् | प्र | भू | र् | ण |

# घटना 11

## सुगावा #1 शीर्षक

चालणा-या ममी किंवा प्रेताच खटला.

## सुगावा #2 नाटक

मेरीने पाठवलेला दूत घरी परतला आहे आणि तो दूत कोणती बातमी घेऊन येईल हे ऐकण्यासाठी मेरी उत्सुक आहे. त्याच्याकडे आनंदाची बातमी आहे, "हा आजार मृत्यूने संपणार नाही" असा संदेश घेऊन तो परत आला आहे! मेरी रडते, "खूप उशीर झाला आहे, तो आधीच मेलेला आहे". ती खरोखर अस्वस्थ आहे, "जेव्हा तो येईल तेव्हा मी त्याच्याशी बोलणार आहे कारण मला समजत नाही". मग ती दूताला विनंती करते की कृपया जाऊन फुले आणून अंत्यसंस्काराची तयारी करण्यास मदत करा.

## सुगावा #3 वस्तू

वर्गात ही दृष्य वस्तू सूगावा म्हणून आणाः पांढरी पट्टी किंवा कापड.

## सुगावा #4 पुराण वस्तू संशोधन

बेथानी आज जसे दिसते त्याचा फोटो.(गूपितः लाजरस इथे राहत होता.)






## सुगावा #5 पवित्र शास्त्रातील दृष्य

गूपितः बंद कबर, वास कारण लाजर तिथे 4 दिवस होता आणि मार्था व मरिया म्हणाल्या की जर कबर उघडल्या गेली तर दुर्गंध येईल.

## धडा

**लाजर पवित्र शास्त्रामधूनः योहान 11:1-44**



येशू एका शहराला भेट देत होता व तो त्याची प्रिती लोकांना व्यक्त करीत होता, त्याला कळले की त्याचा चांगला मित्र लाजर आजारी आहे व मरत आहे.लाजराची बहिण येशूला सांगायला आली की त्याने तिच्या भावाला वाचविण्यासाठी लवकर परत यावे. येशूने निर्णय घेतला की लाजराला मदत करायला जाण्याआधी आणखी दोन दिवस थांबावे. त्याने त्याच्या शिष्यांना सांगितले की लाजर झोपी गेला आहे परंतू कोणाला समजले नाही की तो खरंच मरण पावला आहे. जसे येशू व त्याचे शिष्य शहराच्या आत येत होते, लाजराच्या बहिणी येशूकडे आली व म्हणाली की जर तो दोन दिवस आधी आला असता तर लाजर जिवंत असता. येशूने त्यांना विचारले की ते विश्वास ठेवतात का की तो ख्रिस्त देवाचा पुत्र आहे आणि जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याला सार्वकालिक जीवन मिळेल. त्यांनी होकार दिला की त्या विश्वास ठेवतात, परंतू येशू नेमके काय म्हणत आहे हे त्यांना समजले नाही.येशूने ज्या कबरेत लाजराला ठेवण्यात आले होते तिथे सर्वांना नेले. त्याने धोंड बाजूला करण्याची आज्ञा दिली आणि बहिणीनी त्याला विनंती केली की तसे करू नये.लाजर मरून चार दिवस झाले होते व त्याला दुर्गंधी येत असावी. येशूने त्यांना म्हटले," मी तुम्हाला सांगितले नाही का की जर तुम्ही विश्वास ठेवला तर देवाचे गौरव पाहाल?“ त्याने धोंड बाजूला करायला लावली आणि मोठयाने म्हटले," लाजरा बाहेर ये!“ मग लाजर जिवंत असा बाहेर आला! येशूने त्याचा मित्र लाजर हयाला मेलेल्यातून उठविले!



## लागूकरण

जेव्हा वाईट गोष्टी घडतात तेव्हाही देव माझ्यावर प्रिती करतो.

## गृहपाठ

कोणातरी सोबत वाईट घडले असेल त्यांच्या साठी चांगले काम करा.

## पाठांतर वचन

" येशूने तिला म्हटले पुनरूत्थान व जीवन मिच आहे जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असला तरी जगेल. "
योहान 11:25

## देवाचा डीएनए

हया पाठातून आपण देवाबद्दल काय शिकतो? देवाची इच्छा आहे की लोकांनी समजावे की पुनरूत्थान आहे.



## खेळ मूळाक्षरे पाठ

शिक्षक वर्गाची जोड्यांमध्ये विभागणी करेल. गुपचूप लिहिलेले अक्षर पाहण्यासाठी प्रत्येक गटातील एक सदस्य शिक्षकांकडे येतो. विद्यार्थ्यांना बोलण्याची, अक्षर बोलण्याची किंवा त्यांच्या भागीदारांना कोणतेही संकेत देण्याची परवानगी नाही.
जेव्हा विद्यार्थी आपल्या जोडीदाराकडे परत जातात, तेव्हा शिक्षक "जा" म्हणतात आणि विद्यार्थी आपल्या बोटाने आपल्या जोडीदाराच्या पाठीवर अक्षर काढतो. जोडीदाराने अक्षर शोधून काढल्यास जोडीदाराने हात उंचावून ते अक्षर काय आहे हे सांगावे. अक्षर बरोबर असेल तर जोडीला एक गुण मिळते. जर अक्षर चुकीचे असेल तर जोपर्यंत एक जोडी अक्षराचा अचूक अंदाज घेत नाही तोपर्यंत खेळ चालूच राहतो. सर्वाधिक गुण मिळवणारा गट हा सामना जिंकतो. मोठ्या मुलांसाठी भिन्नता: एका अक्षराऐवजी तीन अक्षरांचे शब्द लिहा.



## लूकसचा प्रयोग


प्रत्येक मुलाला त्याच्या कपाळावर कागदाचा तुकडा पकडू दया व स्वतःचे नाव त्यावर लिहू दया. जेव्हा ते मागून लिहावे लागते तेव्हा ते कठिण होते.
(व्हिडिओ पाहण्यासाठी किंवा सीबीआयकडे जाण्यासाठी या क्यूआर कोडचा वापर करा: लुकसचे यूट्यूबवरील प्रयोग)

## चर्चेसाठी प्रश्न :

आजच्या धड्याविषयी चर्चेत मोठ्या विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी सीबीआयच्या प्रश्नांचा वापर करा: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिका. त्याची उत्तरेही पुस्तिकेत देण्यात आली आहेत.

## विद्यार्थी पानांसाठी उत्तरे





पांढ-या चैकणावर सुरवात करा आणि मग काळया चैकणाला स्पर्श करत जा. मग पांढ-या, काळया, पांढ-यावर असे करत पुढे जा. एका कोप-यातून दुस-या कोप-याकडे जावू नका.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ण | र् | प् | रा | प्रा | र्थ | ना |
| श | ह | र | न | म् | र | वं |
| मृ | ही | ती | शो | य | उ | ई |
| ई | पॅ | ले | क | यो | ठ | फ |
| त | चा | र् | क | म | वि | ही |
| ल | ल | ज | र | स | णे | ये |
| ऐ | णे | ह | णा | ल | गा | णे |
| भ | दे | ळे | रे | व | त | प्रा |
| छा | व | वि | श्वा | स | ठे | व |
| ना | स | ती | र् | थ | ना | णे |
| ये | णे | र् | प् | मा | क | क |
| शू | क | त | मृ | ही | ष् | प्रि |
| र् | क | जी | वं | त | ह | ती |
| म | म्मी | प्रा | ल | ज | स | रे |

| | |
|---|---|
| लजरस | देव |
| शोक करणारे | मृत |
| माहीत | येशू |
| विश्वास ठेव | शहर |
| प्रार्थना | |
| प्रिती | |
| चालणे | |
| मम्मी | |
| उठविणे | |
| येणे | |
| जीवंत | |

# घटना 12

## सुगावा #1 शीर्षक

खोटे बोलण्याच्या कटाचा खटला.

## सुगावा #2 नाटक

दोन खुनाच्या घटनास्थळाचा तपास करण्यासाठी पोलिस आले आहेत. दरवाज्याची चौकशी केली जात आहे, पण त्याला खात्री आहे की ही हत्या नव्हती, आत्महत्या होती - दोघे जण फसवणुकीचा बेत आखत हॉलमध्ये आले होते परंतु ते भयंकर चुकले आणि त्यांचा मृत्यू झाला. दरवाजावाला पोलिसांना सांगतो की त्याने फक्त हॉलमधून मृतदेह बाहेर नेण्यास मदत केली - ते दोघेही निरोगी परंतु मृत दिसत होते! तो पोलिसांना सांगतो, या हॉलमध्ये खूप कमी खोतार्दे येतात.

## सुगावा #3 वस्तू

वर्गात ही दृष्य वस्तू सूगावा म्हणून आणाः नाणे


## सुगावा #4 पुराण वस्तू संशोधन

येरूशलेमेतील शलमोनाच्या देवडीचे आजचे चित्र. (गूपितः प्रेषित 3 सांगते की पेत्र शलमोनाच्या देवडीत संदेश देत होता. प्रेषित 5 मध्ये हनन्या व सपीरा बरोबर पेत्राचा संवाद हा हया जगेत किंवा तिच्या जवळ घडला असावा.




## सुगावा #5 पवित्र शास्त्रातील दृष्य

गूपितः मालमत्ता विकून मिळालेले पैसे(परंतू पूर्ण पैसे नाही) एक स्त्री व पूरूषाच्या प्रेताचे ठसे.(पुरूष आधी गेला व मग स्त्री)



## धडा

**हनन्या व सपीरा पवित्र शास्त्रामधूनः प्रेषित 5:1-11**



येशूच्या शिष्यांनी येशूच्या चांगूलपणा बद्दल सांगितल्यावर लोक एकमेकांना मदत करण्यासाठी प्रेरित झाले. ते गरीबांना मदत करण्यासाठी स्वतःची मालमत्ता सुध्दा विकत असत.हनन्या व सपीरा काही वेगळे नव्हते, त्यांनाही मदत करण्याची इच्छा होती. हनन्या व सपीरा जवळ एक जागा होती जी विकून ते पैसे दान करू शकत होते.

जसे हनन्या व सपीराने जमीन विकली तसे त्यांनी मिळालेल्या पैश्या पैकी काहीच पैसे शिष्यांना देण्याचे ठरविले, परंतू त्यांनी असे दाखविले की जणू त्यांनी पूर्ण पैसे दिले आहेत. हनन्या खूप खूश होता जेव्हा त्यांनी पेत्राला पैसे दिले परंतू पवित्र आत्म्याने पेत्राला दाखवून दिले की हनन्या खोटा बोलत आहे. त्याने हनन्याला विचारले की जमीनीचे हे सर्व पैसे आहेत का आणि हनन्या खोटा बोलला व त्याने होय म्हटले. पेत्राने त्याला विचारले की जेव्हा तो देवासाठी काही तरी चांगले करित होता तेव्हा त्याने सैतानाला त्याचे मन कसे भरवू दिले. जमीन हनन्या आणि सपीराची होती त्यांना ती विकून पैसे देणे भाग नव्हते. परंतू त्यांनी त्यासंबंधी लबाडी केली. पेत्राने त्याचा निषेध केला आणि तो मरण पावला! काही तासांनी सपीरा तिच्या नव-याला शोधण्यासाठी आली. जेव्हा पूत्राने तीला पाहीले तेव्हा त्यानी तिला विचारले की त्यांनी जमीन विकून पूर्ण पैसा दिला का. ती सुध्दा तिच्या पती प्रमाणे खोटी बोलली. पेत्राला धक्का बसला सपीरासुध्दा देवाबरोबर लबाडी करीत होती आणि त्याने दुःखाने तिला विचारले की ती देवाची परिक्षा कशी पाहू शकते. सपीराला लगेच कळले की तिचा पती मेला आहे आणि तीला तिच्या पतीला पूरणा-या लोकांना तिने पाहीले आणि ती सुध्दा मरून पडली.

## लागूकरण

देवाची इच्छा आहे की आपण नेहमी सत्य बोलावे.

## देवाचा डीएनए

हया पाठातून आपण देवाबद्दल काय शिकतो? देव लोकांच्या मन व त्यातील हेतू जाणतो.

## पाठांतर वचन

" एकमेकांबरोबर लबाडी करू नका कारण तुम्ही जुन्या मनुष्यास त्याच्या कृतीसह काढून टाकले आहे." कलस्सै 3:9

## गृहपाठ

तुम्ही केलेल्या लबाडीचा विचार करा. या पूढे कोणाशीही ती लबाडी न करण्याचा निर्णय घ्या. कागदाचा एक लहान तुकडा घ्या व त्यावर ती लबाडी लिहा. त्यावर प्रार्थना लिहा की देवाने तुम्हाला हया पूढे ती लबाडी न करण्यासाठी मदत करावी. हा कागद घरा बाहेर नेऊन जमीनीत पूरा.



## खेळ कोणी नाणे दिले नाही

शिक्षक विद्यार्थ्यांना गोला बसायला लावतील आणि एका मुलाला पेत्र बनवेल आणि गोलाच्या मधात उभं करील. एका विद्यार्थ्याला(हनन्या) लहान शिक्का देण्यात येईल आणि तो त्याच्या पाठी मागून गोलात फिरवले जाईल, दुसरा शिक्का दुस-या मुलाला(सपीरा) दिला जाईल आणि तो दुस-या दिशेने गोलात पाठी मागून फिरविला जाईल. सर्व मुलांना शिक्का हातात येवो की न येवो ते तो फिरविण्याची नक्कल करतील. मुलं शिक्का फिरवित असतांना शिक्षक पेत्राला डोळे बंद करून एक दोनदा फिरवेल. शिक्षक पेत्राला डोळे उघडून हे ओळखायला लावतील की शिक्का कोणाकडे आहे.पेत्र हनन्या व सपीरा(हातात शिक्का असलेला विद्यार्थी) शोधे पर्यंत खेळ सुरू राहील. शिक्का हातात असतांना पकडला गेलेला विद्यार्थी पुढचा पेत्र बनेल.

## लूकसचा प्रयोग


प्रत्येक मुलाला टेबल वर एका कागदावर खूण करायला लावा, मग त्या विद्यार्थ्याची जागा बदला व त्याला तिच खूण पुन्हा एक डोळा बंद करून करायला लावा. (व्हिडिओ पाहण्यासाठी किंवा सीबीआयकडे जाण्यासाठी या क्यूआर कोडचा वापर करा: लुकसचे यूट्यूबवरील प्रयोग)



## चर्चेसाठी प्रश्न :

आजच्या धड्याविषयी चर्चेत मोठ्या विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी सीबीआयच्या प्रश्नांचा वापर करा: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिका. त्याची उत्तरेही पुस्तिकेत देण्यात आली आहेत.


## विद्यार्थी पानांसाठी उत्तरे



→ -बाणाच्या दिशेने जा

-तुम्हाला कोणत्या मार्गाने जायचे आहे ते निवडा. (↑↓←→)

-ज्या दिशेने तुम्ही जात आहात त्याच दिशेने जा. वळू नका.



| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पै | क | ट | मो | ल | धा | दे | व | आ | नं | द | य | ल |
| ग | ल् | या | थ | पै | व | य | ती | पे | र | पे | दा | श |
| जा | नि | र्ण | य | घे | णे | म | र | या | जा | त् | धा | शि |
| ख् | व | पे | ती | र | खो | टे | बो | ल | णे | स | व | ष्य |
| र | ल | त्र | आ | नं | द | न | पे | व | य | घे | पी | र् |
| स् | प् | प्रि | ती | र् | पै | सा | र | ण | य | म | या | रा |
| त | स | का | ळ | ह् | न् | जा | णे | र् | दा | न | ल | र |

# घटना 13

## सुगावा #1 शीर्षक

विचित्र रात्र स्वप्नाची घटना

## सुगावा #2 नाटक

बेपत्ता झालेल्या आपल्या धाकट्या मुलाचा शोध घेण्यासाठी एका पित्याने खासगी अन्वेषक पाठविला आहे; त्याला मृत किंवा जिवंत शोधावे लागते. मुलगा काही दिवसांपूर्वी अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण जॅकेट परिधान करताना दिसला होता. एका व्यक्तीने मुलाला दोठाण येथे रस्त्याने पाठवले, जिथे मोठे भाऊ जात होते, अशी माहिती तपास अधिकाऱ्यांना मिळाली आहे. आता त्या व्यक्तीला काळजी वाटते कारण धाकट्या मुलाने वडिलांना आपल्या वाईट वागणुकीबद्दल सांगितल्याचा भाऊ रागावला होता आणि ते एखाद्या गोष्टीबद्दल मंद आवाजात बोलत होते. धाकट्या मुलाला सापडेपर्यंत भाऊ शांत होतील, अशी त्याला आशा होती.


## सुगावा #3 वस्तू

वर्गात ही दृष्य वस्तू सूगावा म्हणून आणाः उशी.

## सुगावा #4 पुराण वस्तू संशोधन

जगात असे ठिकाणं आहेत जिथे गहू हाताने सोंगला जातो. (गूपितः जेव्हा योसेफाच्या स्वप्नातील पेंढया त्याच्या पूढे वाकल्या तेव्हा त्या अशाच दिसल्या असतील.)






## सुगावा #5 पवित्र शास्त्रातील दृष्य

गूपितः योसेफाचे स्वप्न; त्याच्या वडीलांसाठी सूर्य, आईसाठी चंद्र व त्याच्या भावांसाठी 10 तारे.

## धडा

**योसेफ व त्याचे स्वप्न पवित्र शास्त्रामधूनः उत्पत्ती 37:1-11**



योसेफ एक याकोब नावाच्या धनगराचा सर्वात लहान मुलगा होता. त्याची मोठे भाऊ त्याचा राग करित असत कारण त्यांचे वडील इतरांपेक्षा योसेफावर अधिक प्रिती करत होते. याकोब म्हातारा झाल्यावर योसेफ जन्मला म्हणून तो त्याचा आशीर्वाद आहे असे त्याच्या वडीलांना वाटले, व ते त्याच्यावर खूप प्रिती करीत होते. योसेफ याकोबाच्या आवडत्या बायकोचा मुलागा होता. याकोबाने योसेफासाठी रंगबिरंगी झगा तयार केला होता आणि हयामूळे ते इतके चिडले की त्याच्याबरोबर नीट बोलत सुध्दा नव्हते. मग देवाने योसेफाला दोन वेगवेगळे स्वप्न दिले. पहिले जे त्याचे भाऊ व तो शेतामध्ये पेढयां बांधताना घडले अचानक त्याची पेंढी उभी झाली व त्याच्या भावांच्या पेढयांनी तीला नमन केले. दुसरे स्वप्न सूर्य, चंद्र व तारे या संबंधाने होते. त्याचे वडील सूर्य, आई चंद्र व त्याचे भाऊ तारे होते व त्या सर्वांनी त्याला नमन केले. योसेफाने त्याचे स्वप्न भावांना व वडीलांना सांगितले आणि त्यांना सर्वांना राग आला. भावांनी हा विश्वास ठेवण्यास नाकार दिला की ज्या भावाचा ते राग करतात त्याला ते एक दिवस नमन करतील. याकोबाने सुध्दा त्याच्या मुलाचा निषेध केला कारण तो व त्याची पत्नी त्याच्या पूढे नमन करणार हयावर ते विश्वास ठेवू इच्छित नव्हते.परंतू याकोब नेहमी त्याच्या मनात आठवण ठेवत असे. अनेक वर्षानंतर त्याचे स्वप्न पूर्ण झाले आणि योसेफाला देवाने मिसराचा पुढारी केले ज्याने अनेकाचे प्राण भयंकर अशा दुष्काळातून वाचविले.

## लागूकरण

मला माहीत आहे की देव माझ्या मित्रांना व कुटुंबाला वेगवेगळे दानं देतो.

## गृहपाठ

देवाने तुमच्या पेक्षा वेगळया क्षमता, दानं व शक्ति दिल्या अशा लोकांची यादी तयार करा. देवाने तुम्हाला त्यांच्या दानाबद्दल हेवा न करण्यासाठी मदत करावी म्हणून प्रार्थना करा.

## पाठांतर वचन

" तर देवाने आपल्या इच्छेप्रमाणे शरीराला वेगवेगळे सर्व अवयव लाविले आहेत, ते सव अवयव मिळून एक असते तर शरीर कोठे असते? "
1 करिंथ 12:18,19.



## देवाचा डीएनए

हया पाठातून आपण देवाबद्दल काय शिकतो? देव कधी कधी लोकांना भविष्यासाठी त्याच्या योजना दाखवित असतो.



## खेळ स्वप्नांचा खेळ

शिक्षक वर्गाची दोन गटात विभागणी करून हा खेळ सुरू करतो: धान्य आणि ताऱ्यांचे पेंढ्या. शिक्षक वर्गाच्या शेवटी सुरक्षा रेषा निश्चित करेल जिथे विद्यार्थी धावतात आणि त्यांना टॅग / पकडले जाऊ नये. शिक्षक कथा सांगेल आणि जेव्हा संघ त्यांचा शब्द ऐकेल (उदाहरण: धान्य किंवा तारे) तेव्हा ते सुरक्षिततेकडे धावतील.
दुसरी टीम एखाद्या विद्यार्थ्याला सुरक्षित स्थळी पोहोचण्यापूर्वी टॅग/पकडण्याचा प्रयत्न करेल. टॅग केलेल्या/ पकडलेल्या विद्यार्थ्याला टॅग/पकडणाऱ्या टीममध्ये सामील होणे आवश्यक आहे. १५ मिनिटांच्या शेवटी ज्याच्या एका बाजूला सर्वाधिक खेळाडू असतात तो सामना जिंकतो. पराभूत होणारे संघ बायबलच्या कथेची आठवण म्हणून विजयी संघापुढे नतमस्तक होतात.

## लूकसचा प्रयोग


प्रत्येक विद्यार्थ्यालाला एका पायाने त्याचे नाव कागदावर लिहायला लावा.
(व्हिडिओ पाहण्यासाठी किंवा सीबीआयकडे जाण्यासाठी या क्यूआर कोडचा वापर करा: लुकसचे यूट्यूबवरील प्रयोग)




## चर्चेसाठी प्रश्न :

आजच्या धड्याविषयी चर्चेत मोठ्या विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी सीबीआयच्या प्रश्नांचा वापर करा: प्रगत स्तर विश्लेषण पुस्तिका. त्याची उत्तरेही पुस्तिकेत देण्यात आली आहेत.

## विद्यार्थी पानांसाठी उत्तरे





योसेफ
वेगळे
देणगी
कुटूंब
तुरूंग
भितीदायक स्वप्न
विचित्र
नम्र

गर्वीष्ट
प्रिती
दुष्काळ
गुलाम
राजकुमार
मिसर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग | ल | या | थ | स्व | दु | ष्का | ळ | कु | व | ला | तु | न | न |
| यो | से | फ | प् | प्रि | ला | तु | गी | टुं | कु | ग | फ | भ | म्र |
| जी | वं | त | र | ती | ळे | ष् | ट | ब | तु | वि | चि | त्र | र |
| टुं | तु | भ | ती | भि | ती | दा | य | क | स्व | प्न | त | रू | ण |
| वे | रूं | व | च | त् | टुं | गु | ला | म | मि | टुं | दे | ण | गी |
| म | ग | वीं | ष्ट | ष् | ट | का | ळ | कु | स | ग | र् | फ | प् |
| दे | ण | ळे | द | व | रा | ज | कु | मा | र | वी | ळ | त | र |